


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक १६० * नांदेड * मंगळवार, दि. १६ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# १०७ दिवसांपासून सुरू असलेले अमेरिका आणि इराणमधील युद्ध थांबले

## दोन्ही देशांकडून शांतता करारावर शिक्कामोर्तब

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** जागतिक राजकारणाला कलाटणी देणारी घडामोड घडली आहे. अमेरिका आणि इराण दरम्यान गेल्या १०७ दिवसांपासून सुरू असलेले युद्ध अखेर थांबले आहे. दोन्ही देशांनी शांतता करारावर शिक्कामोर्तब केले असून, येत्या शुक्रवारी, १९ जून रोजी स्वित्झर्लंडमध्ये या करारावर अधिकृत स्वाक्षरी केली जाणार आहे. पश्चिम आशियातील तणाव निवळण्यासाठी हे एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

अमेरिका आणि इराणमधील युद्ध थांबणार असल्याचे समोर आल्यानंतर जगाला मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र, या शांतता करारातही अमेरिका-इराण यापैकी कोणत्या देशाचा फायदा अधिक झाला, यावर चर्चा सुरू झाल्या आहेत. प्राथमिक माहितीनुसार, अमेरिकेपेक्षा इराणचा अधिक फायदा झाला असल्याचे म्हटले जात आहे.

कराराच्या अटींची अधिकृत घोषणा अद्याप झालेली नसली, तरी इराणच्या एका न्यूज एजन्सीने यातील १४ प्रमुख मुद्द्यांचा मसुदा प्रसिद्ध केला आहे.

यामध्ये कायमस्वरूपी शस्त्रसंधी, सैन्य माघार, होर्मुझ सामुद्रधुनी खुली होणार, आर्थिक निर्बंध हटणार, ३०० अब्ज डॉलरचे पॅकेज, अण्वस्त्र बंदी, हस्तक्षेप न करण्याचे आश्वासन यांचा समावेश आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, इराणने स्पष्ट केले आहे की, अंतिम बोलणी सुरू होण्यापूर्वी त्यांचे गोठवलेले १२ अब्ज डॉलरचे विदेशी फंड जारी करावे लागतील. त्याशिवाय इराणच्या तेलावर असलेले निर्बंध आणि नौदलाची नाकेबंदी हटवण्याची मागणी करण्यात आली आहे. या कराराला संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या प्रस्तावाद्वारे अधिकृत मान्यता दिली जाणार आहे.

### युद्ध थांबताच कच्चे तेल प्रति बॅरल ८१.०१ डॉलर्सपर्यंत खाली

होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा खुली होणार असल्याची अपडेट येताच आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्चा तेलाचे दर क्रॅश झाले. ब्रेंट क्रूड फ्यूचर्समध्ये ४ टक्क्यांची घट झाली. तर, युएस वेस्ट टेक्सास इंटरमीजिएटमध्ये ४.६० टक्क्यांची घसरण झाली. अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता कराराचे संकेत मिळताच कच्चा तेलाच्या दरात घसरण दिसून येत होती. मात्र, डोनाल्ड ट्रम्प यांनी शांतता करारावर सहमती झाल्याची घोषणा करताच कच्चा तेलाचे दर आणखी घसरले. ब्रेंट क्रूडचा दर ४ टक्क्यांनी घसरले आणि ८३ डॉलर प्रति बॅरलवर आले. दुसरीकडे डब्ल्यूटीआय क्रूडचा दर ८० डॉलर प्रति बॅरलवर आला. Murban Crude चा दर देखील ८३ डॉलर वर पोहोचला.

# ठाकरे गटाचे खासदार फुटणार? चर्चांना पुन्हा उधाण



**मुंबई (प्रतिनिधी)–** ज्यांना जायचे आहे, त्यांनी खुशाल जावे, त्यांचे भले व्हावे. बाळासाहेबांची शिवसेना सोडून जाणाऱ्यांना आज ना उद्या पश्चाताप होणार आहे, असे नाराज उद्‌गार ठाकरे सेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काढले. पक्षातील काही खासदार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाणार असल्याची चर्चा रंगली आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरेंनीखासदारांची बैठक मातोश्रीवर बोलावली होती.

मिळालेल्या माहितीनुसार मातोश्रीवरील बैठकीत झालेल्या घडामोडींबद्दलचे वृत्त दिले आहे. उद्धव ठाकरे खासदारांची बैठक घेतली. काही खासदार गैरहजर होते, तर काहींनी ऑनलाईन उपस्थिती लावली होती.

या बैठकीत उद्धव ठाकरे म्हणाले की, आजचा दिवस माझा नसला, तर उद्याचा दिवस माझा नक्की आहे. तोपर्यंत सोसावे लागेल, सहन करावे लागेल. जे बाळासाहेबांची शिवसेना सोडून गेले, त्यांना पश्चाताप होईल. पण, तोपर्यंत वेळ गेलेली असेल, असे विधान ठाकरे यांनी खासदारांशी बोलताना केले.

### ठाकरे सेनेचे खासदार स्वतंत्र गट बनवण्यासाठी लोकसभा अध्यक्षांना देणार पत्र?

टीएमसीच्या खासदारांनी बंड केल्यानंतर देशभरात पुन्हा एकदा ऑपरेशन लोटस चर्चेत आले आहे. त्यातच पश्चिम बंगालनंतर महाराष्ट्राच्या राजकारणाकडे सगळ्यांचे लक्ष लागलं आहे. उद्धव ठाकरेंचे काही खासदार शिंदेसेनेच्या संपर्कात असल्याची चर्चा अनेक दिवसांपासून सुरू आहे. त्यात उद्धव ठाकरेंनी बोलावलेल्या तातडीच्या बैठकीला खासदारांनी लावलेली गैरहजेरी या चर्चांना अधिक बळ देणारी ठरली. आता यापुढे उद्धवसेनेचे काही खासदार स्वतंत्र गट स्थापन करण्याच्या हालचाली करत असल्याची बातमी समोर आली आहे. हे खासदार लोकसभा अध्यक्षांना पत्र देणार असल्याची चर्चा आहे.

### शर्मिला ठाकरे यांचा भाजपवर हल्ला

शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यापाठोपाठ तृणमूल काँग्रेस पक्ष फोडण्याची कामगिरी करणाऱ्या सत्ताधारी भाजपला मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी खडे बोल सुनावले आहेत. तुमचे कार्यकर्ते फक्त दुसऱ्यांच्या सतरंजा उचलायला ठेवलेत का, इतरांचे पक्ष कशाला फोडता, भाजपला इतरांचे पक्ष फोडणे, एवढेच काम करायचे आहे. दुसरे पक्ष फोडा, त्यापेक्षा तुम्ही तुमची मुलं मोठी करा ना, असे त्या म्हणाल्या.

### शिवसेनेचे मंत्री उदय सामंत यांनी 'ऑपरेशन टायगर'ची शक्यता फेटाळली

शिवसेना ठाकरे गटाच्या कोणत्याही खासदारासोबत संपर्क नाही, अशी कोणतीही मीटिंग झाली नाही. आम्हाला ऑपरेशन टायगरची गरज नाही, असे म्हणत मंत्री तथा शिवसेना नेते उदय सामंत यांनी ऑपरेशन टायगर संदर्भात मोठं वक्तव्य केलं आहे. तसेच, संजय राऊत यांच्या पेशन्सला दाद देत त्यांनी उबाठाचं अस्तित्व टिकवलं आहे, असेही उदय सामंत यांनी म्हटलं. त्यामुळे, एकप्रकारे उदय सामंत यांनी ठाकरेंचे खासदार शिंदेंच्या संपर्कात नसल्याचेच सूचवलं आहे.

# एक्सपायरी झालेली औषधी विक्री करणाऱ्या मे. तोष्णीवाल मेडिकल्सवर एफडीएची कारवाई

## औषधी दुकानाला ठोकले सील




**नांदेड (प्रतिनिधी)–** अन्न व औषध प्रशासन विभागाचा पदभार आयुक्त तुकाराम मुंढे यांनी घेतल्यानंतर राज्यभरात कारवाईंचा सपाटा सुरू आहे. त्यांच्याकडे तक्रार गेल्यानंतर नांदेडमध्येही कारवाई करण्यात आली. शहरातील डॉक्टर लेन परिसरात असलेल्या मे. तोष्णीवाल मेडिकल्स या दुकानातून मुदतबाह्य औषधाची डॉक्टराच्या चिठ्ठीशिवाय, फार्मासिस्टचे गैरहजेरीमध्ये, विना बिलाने विक्री झाल्याचे स्पष्ट झाल्यामुळे सदरील दुकानाविरूध्द औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियम १९४५ अंतर्गत सोमवार, दि. १५ जून रोजी दुपारी कारवाई करण्यात आलेली आहे. संबंधित औषध दुकानाला सील ठोकले असून एक्सपायरी डेट झालेली औषधी एफडीएने ताब्यात घेतल्याचे सहाय्यक आयुक्त (औषध) अशोक राठोड यांनी सांगितले.

नायगाव येथील हनुमंतराव वन्नाळीकर यांनी डॉक्टर लेन भागातील मे. तोष्णीवाल मेडिकलवरून त्यांच्या वृध्द वडिलांना मधुमेहाच्या गोळ्या (टॅबलेट) घेतल्या. घरी गेल्यानंतर त्यांच्या मुलीने त्यावरील तारीख बघितली असता ते मुदतबाह्य असल्याचे तिने वडिलांना सांगितले. यानंतर थेट हनुमंतराव वन्नाळीकर यांनी मुख्यमंत्री कार्यालय आणि एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याकडे ई-मेलद्वारे तक्रार केली. या तक्रारीची तात्काळ दखल घेत तुकाराम मुंढे यांनी नांदेडच्या एफडीएला तात्काळ संबंधित औषध दुकानावर कारवाई करण्याचे आदेश दिले आणि यानंतर येथील यंत्रणा कामाला लागली. विशेष म्हणजे सोमवारी पुन्हा हनुमंतराव वन्नाळीकर हे याच मेडिकलवर तीच औषधी घेण्यासाठी गेले असता एक्सपायरी डेट झालेली औषधी त्यांच्या हातावर थोपवली आणि त्यानंतर सदर मेडिकल चालक तोष्णीवाल एफडीएच्या जाळ्यात अडकले. पथकाने कसून चौकशी करून मुदतबाह्य झालेली औषधे ताब्यात घेतली असून औषधी दुकानाला सील ठोकले आहे. सर्वसामान्यांच्या आरोग्याला धोका पोहोचणाऱ्या अशा मेडिकल चालकांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी हनुमंतराव पाटील वन्नाळीकर यांनी केली आहे.

औषध विक्रेत्यांनी डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय फार्मासिस्टचे गैरहजेरीमध्ये विना बिलाने औषधाची विक्री करू नये. डॉक्टराच्या चिठ्ठीवरील औषधी विक्री करतेवेळी विक्री करण्यात येत असलेल्या औषधाचा तपशील व औषधावर नमूद तपशील यामध्ये तफावत आढळून येणार नाही याची त्यांनी गांभीर्याने दक्षता घ्यावी. मुदतबाह्य औषधांच्या सेवनामुळे रूग्णांचे आरोग्यावर त्याचे विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी मुदतबाह्य औषधी विक्री होणार नाही याची कटाक्षाने दक्षता घ्यावी, असे आवाहन सर्व औषधी विक्रेत्यांना करण्यात आले आहे.

सर्व औषध विक्रेत्यांनी सतर्क राहून औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियम १९४५ चे पालन करूनच औषधांची विक्री करावी. कायद्याचे उल्लघंन झाल्यास किंवा त्यांच्याविरूध्द या प्रशासनास तक्रारी प्राप्त झाल्यास व सत्यता पडताळणीमध्ये दोषी आढळून आल्यास त्यांच्याविरूध्द कडक कारवाई घेण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी.

नागरिकांनी अशा प्रकारची औषधी विक्री होत असल्याचे आढळून आल्यास, त्यांनी तात्काळ प्रशासनाकडे संपर्क साधावा जेणे करून संबंधित दुकानांविरूध्द कारवाई करता येईल, असे सहायक आयुक्त (औषधे) अ. तु. राठोड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपकेंवर हल्ला

## जयपूरमध्ये आंदोलनावेळी घडली घटना

**जयपूर (प्रतिनिधी)–** जयपूरमध्ये, कॉकरोच जनता पार्टीचे (सीजेपी) संस्थापक अभिजीत दीपके यांना दोन तरुणांनी हल्ला करत मारहाण केली आहे. त्यानंतर पक्षाच्या समर्थकांनी त्या दोघांना पकडून बेदम चोप दिला.

अभिजीत नीट पेपरफुटी, शिक्षण व्यवस्था, बेरोजगारी आणि तरुणांशी संबंधित इतर समस्यांविरुद्धच्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी आले होते. अभिजीत यांच्या नेतृत्वाखाली शेकडो आंदोलक शहीद स्मारकावर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत होते. आंदोलनादरम्यान, घोषणाबाजीवरून काही तरुणांमध्ये वाद झाला. पोलिसांनी एका तरुणाला ताब्यात घेतले. आंदोलनस्थळी अनेक आंदोलकांचे मोबाईल फोनही चोरीला गेले. यानंतर, व्यासपीठावरून आपले मोबाईल फोन आणि सामान सुरक्षित ठेवण्याचे आवाहन करण्यात आले.

आंदोलनात सहभागी झालेले तरुण 'मी माझ्या देशावर प्रेम करतो, मी भ्रष्टाचार नाकारतो' आणि 'पेपरफुटी थांबवा' यांसारख्या घोषणा असलेले फलक आणि तिरंगा घेऊन आले होते. काही महिला आपल्या लहान मुलांसोबत आंदोलनात सामील झाल्या. कार्यकर्त्यांनी शहीद स्मारकाच्या प्रवेशद्वारावर कॉकरोच चित्र काढले आणि धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या! अशी घोषणा लिहिली. ज्या तरुणाने थप्पड मारली तो म्हणाला, हे लोक जिहादी मानसिकतेचे आहेत. मी जयपूरचा आहे. मी एक राष्ट्रवादी आहे. हा अभिजीत दीपक विनाकारण देशाची दिशाभूल करत आहे. ही पेपरफुटी केवळ एक निमित्त आहे.

सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके शहीद स्मारकाजवळ पोहोचताच तरुणांमध्ये झटापट झाली. दीपके यांना खांद्यावर उचलून आत नेले जात होते. यावेळी जमावातील दोन तरुणांनी त्यांना थप्पड मारली. सीजेपीच्या सदस्यांनीही त्या तरुणाला चोप दिला. कानशिलात मारणाऱ्यांना पोलिसांनी अटक करून ताब्यात घेतले आहे.

# राज्याचं पावसाळी अधिवेशन २२ जूनपासून सुरु होणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र विधिमंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनाचे सविस्तर वेळापत्रक ठरवण्यासाठी मुंबईत पार पडलेली 'कामकाज सल्लागार समितीची' महत्त्वाची बैठक आता संपली आहे. या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, राज्याचे पावसाळी अधिवेशन २२ जून ते १० जुलै २०२६ या कालावधीत मुंबईत होणार असल्याचे निश्चित झाले आहे.

कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये सविस्तर चर्चा झाली. या बैठकीत अधिवेशनाचा कालावधी निश्चित करण्यात आला असून, आगामी पावसाळी अधिवेशनाचे कामकाज एकूण तीन आठवडे चालणार आहे.

# शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांची बैलगाडीतून वाजत-गाजत मिरवणूक

## विद्यार्थ्यांनी पाठयपुस्तकापुरते मर्यादित न राहता अवांतर वाचनाची सवय ठेवावी -जिल्हाधिकारी कर्डिले




**नांदेड (प्रतिनिधी)–** शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांची बैलगाडीतून वाजत-गाजत मिरवणूक काढून स्वागत करण्यात आले. यावेळी शिक्षण हे व्यक्तिमत्त्व विकासाचे आणि उज्वल भवितव्य घडविण्याचे प्रभावी साधन असून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यात जिल्हा परिषद शाळांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित न राहता अवांतर वाचनाची सवय लावून ज्ञानाचा विस्तार करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

दि. १५ जून २०२६ रोजी महाराष्ट्र शासनाच्या शाळा प्रवेशोत्सव अभियानांतर्गत नांदेड तालुक्यातील जिल्हा परिषद हायस्कुल, मरळक बु. येथे उत्साहपूर्ण वातावरणात शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले उपस्थित होते. यावेळी त्यांनी शालेय वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्याची गरज व्यक्त करुन, जिल्हा परिषद शाळांच्या शिक्षणपद्धतीचे महत्त्व अधोरेखित केले. जि. प. हा. मरळक बु. या शाळेस भेट देताना आपल्या शालेय जीवनातील आठवणी जाग्या झाल्याचे सांगून, आपले प्राथमिक शिक्षणही जिल्हा परिषद शाळेतच झाल्याचा उल्लेख केला.

संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा परिषद शाळांमध्ये शाळा प्रवेशोत्सव साजरा केला जात असून, शाळेस जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसीलदार तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी भेट देत आहेत. नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत करताना त्यांच्या आयुष्यातील शाळेतील पहिल्या पावलाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

जिल्हा परिषद शाळांमधूनच खरे शिक्षण मिळते आणि जीवनाला योग्य आकार मिळतो, असे प्रतिपादनही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले. विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकांबरोबरच अवांतर वाचनाची सवय लावावी, यासाठी शाळेतील वाचनालयातील पुस्तके विद्यार्थ्यांसाठी खुली ठेवावीत, अशी सूचना त्यांनी केली. शाळेतील भौतिक सुविधांची आवश्यकता पूर्ण करण्याचे आश्वासन देताना खेळाचे मैदान विकसित करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच मैदानी खेळांमध्येही सक्रिय सहभाग घ्यावा, असेही ते म्हणाले.




# विधान परिषद निवडणुकीतील गायब झालेले नगरसेवक गोव्यात अवतरले! सोशल मीडियावर फोटो व्हायरल



**नांदेड (प्रतिनिधी)–** विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने जिल्हाभरातील नगरसेवक असणारे मतदार सहलीला गेल्याच्या चर्चांना उधाण आलेले आहे. त्यातच आता हे मतदार गोव्यात एन्जॉय करीत असल्याची छायाचित्रे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था नांदेड विधान परिषदेची निवडणूक १८ जून रोजी होऊ घातली आहे. या निवडणुकीमध्ये सत्ताधारी भाजप महायुतीचे उमेदवार अमरनाथ राजूरकर यांचे पारडे जरी जड असले तरी त्यांना शिवसेना महाविकास आघाडीचे कृष्णा पाटील आष्टीकर हे टक्कर देत आहेत. महायुतीकडून शहरासह जिल्हाभरातील विविध नगरसेवकांना गोवा, बंगळुरू यासोबतच उत्तर भारतात पर्यटन करण्यासाठी पाठविण्यात आल्याच्या चर्चा सोशल मीडियावर रंगू लागल्या होत्या. यातच गोवा बिचवर देगलूर येथील नगरसेवकांचा नृत्य करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने या चर्चांना पुष्टी मिळाली असून चर्चांनी अधिकच जोर धरला आहे.

दोन दिवसांपूर्वीच भाजप नेते खासदार अशोकराव चव्हाण यांनी एका पत्रकार परिषदेत सांगितले होते की, नगरसेवक हे आपल्या परिवारासह उन्हाळी सुट्टी घालविण्यासाठी पर्यटनाला गेल्याचा दावा केला होता. नांदेड शहरासह जिल्ह्यातील सर्वच सोळा तालुक्यातील नगरसेवक यांनी पावसाळ्याच्या तोंडावर पर्यटनाच्या नावाखाली वेगवेगळ्या भागात पोहोचले आहेत. विधान परिषदेची निवडणूक असल्याने ते या निवडणुकीचे मतदार आहेत.

आपली बाजू भक्कम करण्यासाठी व कुठेही मतदारांकडून दगा फटका होणार नाही, याची काळजी घेत दोन्हीही उमेदवारांनी आपापल्या नगरसेवकांना वेगवेगळ्या ठिकाणी पाठविल्याच्या चर्चा सुरू आहेत. त्यात भर म्हणजे देगलूर नगरसेवकांचा एन्जॉय करतानाचे व्हिडिओ समाज माध्यमावर व्हायरल झाले आहेत.

### प्रश्न/ समस्या वाऱ्यावर

शहरातील मान्सूनपूर्व कामे करणे सोडून एन्जॉय करण्यासाठी हे नगरसेवक वेगवेगळ्या बिचवर नृत्य करतानाचे व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर शहरातील लोकप्रतिनिधी असे गायब झाल्यानंतर लोकांच्या प्रश्नांचे आणि कामांचे काय असा सवाल विरोधकांनी केला आहे. लवकरच एन्जॉय करण्यासाठी गेलेले हे नगरसेवक आपापल्या नगरीमध्ये परतणार आहेत. त्यानंतर मात्र त्यांना नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# पाकिस्तानशी पुन्हा संवाद? पण...

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध हा केवळ दोन देशांचा विषय नाही; तो संपूर्ण दक्षिण आशियाच्या स्थैर्याशी आणि आशिया खंडातील शांततेशी निगडित आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी पाकिस्तानशी चर्चेचे पर्याय पूर्णपणे बंद करू नयेत, असे मत व्यक्त करून एक महत्त्वाचा मुद्दा पुढे आणला आहे. सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांच्या वक्तव्याचे समर्थन करताना त्यांनी संवादाची गरज अधोरेखित केली. या भूमिकेकडे भावनिक किंवा राजकीय दृष्टिकोनातून नव्हे, तर राष्ट्रीय हित आणि प्रादेशिक शांततेच्या दृष्टीने पाहण्याची आवश्यकता आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंधांचा इतिहास संघर्ष, युद्धे, दहशतवाद आणि अविश्वासाने भरलेला आहे. स्वातंत्र्यानंतर अनेक वेळा दोन्ही देशांमध्ये युद्धे झाली. यामध्ये पाकिस्तानचे प्रचंड नुकसान झाले. परंतु कुत्र्याची शेपूट वाकडीच असल्यामुळे वारंवार भारतामध्ये घुसखोरी करणे त्याने चालूच ठेवले. आजही तो प्रकार चालूच आहे. म्हणूनच सीमापार दहशतवाद, घुसखोरी आणि भारतविरोधी कारवायांमुळे पाकिस्तानविषयी भारतीयांच्या मनात संशय आणि संताप असणे स्वाभाविक आहे. विशेषतः मुंबईवरील २६/११ चा दहशतवादी हल्ला, पठाणकोट, उरी आणि पुलवामा यांसारख्या घटनांनी पाकिस्तान-मधील दहशतवादी यंत्रणांची भूमिका उघड केली आहे. त्यामुळे पाकिस्तानवर सहज विश्वास ठेवणे हे भारतासाठी धोकादायक ठरू शकते. पाकिस्तानचा इतिहास विसरणे हा आत्मघाती प्रकार ठरू शकतो. मात्र, याच वास्तवाचा दुसरा पैलूही आहे. दोन अण्वस्त्रधारी राष्ट्रांमध्ये कायमस्वरूपी तणाव राहणे हे केवळ भारत आणि पाकिस्तानसाठीच नव्हे, तर संपूर्ण आशिया खंडासाठी चिंतेचे कारण आहे. जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या या प्रदेशात आर्थिक विकास, व्यापार, गुंतवणूक आणि सामाजिक स्थैर्यासाठी शांतता आवश्यक आहे. भारत आज जागतिक महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. अशा वेळी सीमांवर सतत संघर्षाची स्थिती राहिल्यास राष्ट्रीय संसाधनांचा मोठा भाग संरक्षण आणि सुरक्षा व्यवस्थेवर खर्च करावा लागतो. त्यामुळे विकासाच्या गतीवरही परिणाम होऊ शकतो. मोहन भागवत यांनी व्यक्त केलेला मुद्दा याच संदर्भात महत्त्वाचा ठरतो. त्यांनी पाकिस्तान या राज्यव्यवस्थेपेक्षा तेथील जनतेशी संवादाचे मार्ग खुले ठेवण्याची गरज अधोरेखित केली आहे. कोणत्याही देशातील सर्वसामान्य नागरिक आणि त्या देशातील सत्ताधारी किंवा लष्करी धोरणे यांची सरसकट सांगड घालता येत नाही. पाकिस्तानमधील अनेक नागरिकही शांतता, स्थैर्य आणि आर्थिक प्रगतीची अपेक्षा बाळगून आहेत. लोकांमधील संवाद, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि मानवी संबंध हे दीर्घकालीन शांततेचे आधारस्तंभ ठरू शकतात. त्या देशात सुद्धा सध्या अंतर्गत बंडाळी शिगेला पोहचली आहे. तेथील भ्रष्टाचार, महागाई आणि बेरोजगारी यामुळे तेथील सामान्य नागरिक अत्यंत त्रस्त झाला आहे. अशा परिस्थितीत त्यांना भारताशी शत्रुत्व घेणे कधीही परवडणारे नाही, परंतु केवळ कट्टर धार्मिकतेच्या नावाखाली तेथील नेते भारतासंदर्भातील द्वेष कायम ठेवत असतात. यासाठीच पाकिस्तान सोबत संवादाचा अर्थ भोळेपणा असा अजिबात नाही. भारताने भूतकाळातील अनुभव विसरता कामा नये. अनेक वेळा शांततेच्या चर्चेच्या आडून पाकिस्तानमधील काही शक्तींनी दहशतवादी कारवायांना पाठबळ दिल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे संवाद सुरू ठेवतानाच राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबतीत शून्य तडजोडीची भूमिका कायम ठेवणे आवश्यक आहे. विश्वास ठेवण्यापेक्षा पडताळणीवर भर देणे, दहशतवादाविरोधात कठोर धोरण राबविणे आणि सीमांची सुरक्षा अधिक मजबूत करणे हे भारताचे प्राधान्य राहिले पाहिजे. आजच्या जागतिक परिस्थितीत युद्ध हा कोणत्याही समस्येचा कायमस्वरूपी उपाय नाही. युद्धामुळे दोन्ही देशांचे नुकसान होते आणि सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांनाच बसतो. त्यामुळे संवाद आणि कणखर सुरक्षा या दोन्ही गोष्टी एकत्रितपणे राबविण्याची गरज आहे. भारताने शांततेचा हात पुढे करावा, परंतु दुसऱ्या हातात राष्ट्रीय सुरक्षेची ढालही तितक्याच मजबुतीने धरली पाहिजे. कारण आशिया खंडाच्या भविष्याचा विचार करता भारत-पाकिस्तान संबंधांमध्ये स्थैर्य असणे अत्यंत आवश्यक आहे. आर्थिक सहकार्य, प्रादेशिक विकास आणि दहशतवादमुक्त वातावरण यासाठी दोन्ही देशांमध्ये किमान संवादाचे पूल तरी कायम राहिले पाहिजेत. परंतु हा संवाद वास्तववादी, सावध आणि राष्ट्रीय हिताला सर्वोच्च स्थान देणारा असावा. शांततेची इच्छा ही भारताची ताकद आहे; परंतु पाकिस्तानच्या इतिहासातून मिळालेला धडा विसरणे ही कमजोरी ठरेल. म्हणूनच, संवादाची दारे उघडी ठेवताना सावधगिरीची कवाडे मात्र कधीही बंद होता कामा नयेत.

# तहानलेले दिवस : संकट पावसाचे की नियोजनाचे?

महाराष्ट्रात जून महिना अर्धा संपत आला आहे, पण पावसाची प्रतीक्षा अद्याप कायम आहे. गेल्या वर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्यानंतरही यंदा राज्यातील अनेक भागांना भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. पुण्यापासून मराठवाड्यापर्यंत, विदर्भापासून कोकणाच्या उंबरठ्यापर्यंत आणि मुंबईसारख्या महानगरालाही टँकरच्या सावटाखाली जगावे लागत आहे. ही केवळ नैसर्गिक आपत्ती नाही; ती आपल्या जलव्यवस्थापनातील त्रुटींचेही प्रतिबिंब आहे.



राज्य सरकारने पुढील तीन महिने पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला आहे. सिंचनासाठीचे आवर्तन बंद करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांना आणि जलसंपदा विभागाला तातडीच्या उपाययोजनांचे आदेश दिले आहेत. हे निर्णय आवश्यक असले तरी ते संकटावरचे तात्पुरते मलम आहेत. मूळ प्रश्न असा आहे की, मागील वर्षी धरणे भरून वाहिली असताना आज ही वेळ का आली?

राज्यातील विविध भागांतील आकडे चिंताजनक आहेत. पुण्यात दिवसाआड पाणीपुरवठ्याची वेळ आली आहे. मराठवाड्यातील जायकवाडीसह अनेक धरणांतील साठा घटत चालला आहे. विदर्भातील नद्या कोरड्या पडत आहेत. कोल्हापूरसारख्या पावसाळी जिल्ह्यातही पिण्याच्या पाण्यासाठी शेतीचा पुरवठा बंद करावा लागत आहे. मुंबई आणि उपनगरांमध्ये टँकरची संख्या वाढत आहे. या चित्रातून राज्याच्या जलसुरक्षेतील कमकुवतपणा स्पष्ट दिसतो.

प्रश्न केवळ कमी पावसाचा नाही. पाणी साठविण्याची, जिरविण्याची आणि पुनर्वापराची यंत्रणा किती प्रभावी आहे, याचाही आहे. पाणी अडवा-पाणी जिरवा, जलयुक्त शिवार यांसारख्या योजनांवर हजारो कोटी रुपये खर्च झाले. परंतु आजही हजारो गावे टँकरवर अवलंबून असतील तर त्या योजनांचे दीर्घकालीन परिणाम कितपत साध्य झाले, याचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन होणे आवश्यक आहे. निधी खर्च झाला म्हणजे उद्दिष्ट साध्य झाले, असे मानता येत नाही.

दुसरीकडे, पाणीचोरी आणि गळती ही मोठी समस्या आहे. अनेक शहरांमध्ये ३० ते ४० टक्के पाणी वितरण व्यवस्थेतच वाया जाते. धरणे, कालवे आणि नद्यांमधून होणारा बेकायदा उपसा आजही सुरू आहे. प्रशासनाने विशेष मोहिमा राबविण्याचे आदेश दिले असले तरी त्या सातत्याने आणि कठोरपणे राबविल्या गेल्या पाहिजेत. पाणी हा संसाधनांचा प्रश्न नसून शिस्तीचा प्रश्नही आहे.

या संकटाचे सर्वाधिक परिणाम ग्रामीण भागावर होत आहेत. पाण्यासाठी महिलांची पायपीट, गावांतील वाद, स्थलांतर, पशुधनाचा प्रश्न आणि पिकांचे नुकसान ही परिस्थिती केवळ आर्थिक नाही तर सामाजिक संकट निर्माण करणारी आहे. जलविद्युत प्रकल्पांवरील परिणाम, उद्योगधंद्यांमधील अडथळे आणि पर्यावरणीय हानी यामुळे राज्याच्या विकासावरही त्याचा परिणाम होणार आहे.

यातून मार्ग काय? तज्ज्ञांनी सुचविलेले उपाय केवळ सूचना म्हणून न राहता धोरणाचा भाग बनले पाहिजेत. ठिबक आणि सूक्ष्म सिंचनाचा व्यापक वापर, कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांना प्रोत्साहन, शहरांतील सांडपाण्याचा पुनर्वापर, उद्योगांमध्ये सर्किट कूलिंग, घरांमध्ये पाणी बचतीची उपकरणे आणि भूजल पुनर्भरण यावर भर द्यावा लागेल. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, जलव्यवस्थापनात लोकसहभाग वाढवावा लागेल. जलपुरुष डॉ. राजेंद्र सिंह यांनी सुचविल्याप्रमाणे समाजाधारित पाणी व्यवस्थापन हाच दीर्घकालीन उपाय आहे.

आजची टंचाई ही भविष्यातील आणखी गंभीर संकटाची पूर्वसूचना आहे. हवामान बदलामुळे पावसाचे स्वरूप अधिक अनिश्चित होत आहे. त्यामुळे केवळ पावसाची वाट पाहून चालणार नाही. पाणी साठवणे, जिरवणे आणि जपून वापरणे ही जीवनशैली बनवावी लागेल. अन्यथा दरवर्षी पावसाळ्याच्या उंबरठ्यावर उभे राहून आपण हाच प्रश्न विचारत राहू धरणे भरली होती, मग पाणी गेले कुठे?

पाण्याचे संकट हे केवळ शासनाचे नाही, तर संपूर्ण समाजाचे आहे. आज घेतलेले शाश्वत निर्णयच उद्याच्या तहानलेल्या पिढीला दिलासा देऊ शकतील. महाराष्ट्राला आता तात्पुरत्या उपायांपेक्षा जलसुरक्षेच्या दीर्घकालीन आराखड्याची गरज आहे. अन्यथा तहानलेले दिवस ही केवळ आजची बातमी राहणार नाही, तर उद्याचे वास्तव बनेल.

**-मच्छिंद्र ऐनापुरे**
जत, जि. सांगली

# शतायुषी व्हा!



बिंदूत सिंधू आणि अणूत विश्व दिसत नाही, तो पोरखेळ होय; ती द्रष्ट्याची दृष्टी नाही! ही ओळ मागे कुठेतरी वाचली आणि आता कधीही वाचतो तेव्हा डोळ्यासमोर एक पांढराशुभ्र अंगरखा घातलेल्या रुबाबदार व्यक्तीची प्रतिमा येते. ज्यांचे निर्मळ बोल, लढावू वृत्ती आणि पूर्णत्वास नेण्याची असलेली जिद्द आम्हा तरुणांना प्रेरक ठरते. आजपर्यंत ज्यांच्याबद्दल एकही शब्द कुणाकडून चुकीचा ऐकला नाही, असे अजातशत्रू व्यक्तिमत्त्व, द्वेषाला प्रेमाने शमवणारे आणि माफीचा भाव बाळगणारे अंकुशराव कदम.

साहेब, तुम्हाला स्तुती आवडत नाही. तेव्हा हे लिहिलेलंही कदाचित आवडणार नाही. पण भावना मांडल्या पाहिजेत म्हणून हा प्रपंच!

मी तुम्हाला पहिल्यांदा भेटलो तेव्हा बहुधा बारावीत शिकत होतो. एका बारावीच्या मुलाचे बोलणे एवढ्या मोठ्या माणसाने का ऐकावे, असा प्रश्न पडण्यासारखी परिस्थिती होती. पण तुम्ही माझे बोलणे मनापासून ऐकले. माझ्याकडे सांगण्यासारखे काही विलक्षण नव्हते, तरी तुम्ही मला वेळ दिला. त्या दिवशीच मला जाणवले की हे व्यक्तिमत्त्व काहीतरी वेगळे आहे, काहीतरी खास आहे. तेव्हा कधी कल्पनाही केली नव्हती की पुढे तुमच्या जवळ राहून, तुमच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मिळेल. मी तर नेहमी तुमच्याकडे ऊर्जा घेण्यासाठी यायचो. काही वेळ बसायचो, बोलायचो आणि नव्या उमेदीने परत यायचो. पण तो प्रवास तिथे थांबला नाही; तो आजही सुरूच आहे.

मला नेहमी एक प्रश्न पडतो, तुम्ही जे आहात ते कसे झालात? हा प्रश्न मी तुम्हाला अनेकदा विचारला आहे. पण उत्तराऐवजी तुम्ही फक्त एक स्मितहास्य देता आणि बुद्ध हसला असं समजून मी कोड्यात पडतो. देणारे हात आणि क्षमा करण्याचा मोठेपणा प्रत्येकात नसतो. साहेब, तुमच्यात मात्र हे दोन्ही गुण विपुल प्रमाणात आहेत.

प्रत्येकाला आपलंसं करणं ते तुम्हालाच जमलं. महत्त्वाचं म्हणजे इतर साधनांनी नाही तर ते तुमच्या निर्मळ स्वभावाने साध्य केलं. तुमच्यासाठी लोक प्राण पणाला लावू शकतात, तुमच्या शब्दाखातर सर्वकाही करू शकतात. ते केवळ तुमच्या स्वभावामुळे. आज कुणीही माणूस तुमच्याकडे हक्काने येतो, त्याची अडचण सांगतो आणि चुटकीसरशी तुम्ही तिचं निरसन करता. हे काही सर्वांना जमत नाही!

मध्यममार्गाचा हा प्रवास निश्चितच सोपा नसावा; पण तुम्ही तो स्वीकारला आणि त्यावर खंबीरपणे चाललात. बुद्धाला जवळून बघितलंत. मला बुद्धापर्यंत नेलं ते तुम्हीच. आधी मी बुद्ध वाचत जरी होतो, तरी तुम्ही मला तो दाखवलात.

तुम्ही जे साम्राज्य उभं केलंय ते स्वप्नवत आहे. तुम्हाला मिळालेली सर्वांची साथ आणि तुमची ध्येयनिष्ठा ही आम्हा लेकरांच्या आयुष्याची प्रेरणा आहे. या मराठवाड्याचे तुम्ही भाग्यविधाते आहात, हे केवळ मी म्हणत नाही तर अवघे लोक हेच म्हणतात. तुम्ही दर्जेदार शिक्षणाची दारं खुली केलीतच; पण त्याचसोबत नावीन्य, आधुनिकता आणि गुणवत्ता यांकडे असलेला तुमचा कल संस्थेला एक नवी उंची प्रदान करत गेला. तुम्ही प्रत्येकावर टाकत असलेला विश्वासच लोकांना कुटुंबाचा भाग असल्याची जाणीव करून देतो.

'जे जे सर्वोत्तम ते हवे' याचा तुम्ही घेतलेला ध्यास नवीन आयामाकडे संस्थेला घेऊन जातो. 'मी पाठीशी आहे' हे म्हणत तुम्ही पाठीवर थाप मारलीत आणि लोक लढायला सज्ज झाले. कल्पित गोष्टी पूर्णत्वाला नेल्या, साध्य केल्या. तुम्ही बोलता तेव्हा ऐकत राहावंसं वाटतं. तुम्ही समजावता तेव्हा त्यामागची दूरदृष्टी कळते आणि चालण्याची वाट सहजच मोकळी होते. 'चालत राहावं, थांबू नये' हा तुमचा संदेश आम्हा तरुणांना दिशा दाखवतोय. 'पेरलेलं बी उगवतं, त्याचा वटवृक्ष होतो; फक्त त्याची काळजी घ्यावी लागते,' हे तुमचं बोलणं साधं जरी असलं तरी त्यामागची दूरदृष्टी कळतेच!

तुमची जगण्याची पद्धत अंगिकारण्याचा प्रयत्न राहील. त्यातला साधेपणा, सोपेपणा आणि नितळपणा जगण्यात यावा यासाठी अंतःकरणात दीप पेटवून तो तेवत ठेवू. स्वयंप्रकाशित होण्याचा प्रयत्न करू.

आमचे भाग्य एवढेच की, आमच्याकडे तुम्ही आहात; आणि आमची संपत्ती एवढीच की, तुमचे विचार आमच्या सोबत आहेत.

साहेब, शतायुषी व्हा! तुमच्या विचारांचा आणि कार्याचा प्रकाश असाच अनेक पिढ्यांना मार्ग दाखवत राहो, हीच मनःपूर्वक प्रार्थना.

**-आशुतोष सुनील पाटील**
हिंगोली

# मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची नैसर्गिक पद्धत



शिक्षणाची भाषा कोणती असावी यावर आपल्याकडे गेली अनेक वर्ष विचारमंथन सुरू आहे. केवळ समाजातच नव्हे तर घराघरांत यावर चर्चा सुरू आहे. चर्चा कसली वाद विवादच म्हणा कारण आईवडील, नातेवाईक, शेजारीपाजारी या सर्वांमध्ये याबाबत मतभिन्नता आढळते. शिक्षणासाठी कोणते माध्यम वापरावे याबाबत तर्कशास्त्र वापरले जात नसल्याने मध्यमवर्गीय आणि निम्नमध्यम वर्गीयांचा गोंधळ उडतो. विशेषतः इंग्रजी माध्यमांच्या शाळा जशा वाढू लागल्या तसा हा गोंधळ जास्त होऊ लागला.

इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून सर्वसामान्य माणूसही आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करू लागला. पूर्वी शहरी भागापूरते असणारे हे लोण आता ग्रामीण भागातही पसरले आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील गरीब, कष्टकरी पालक कर्ज काढून उधार उसनवारी करून लाखो रुपयांच्या देणग्या भरून आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करीत आहेत. मुळात इंग्रजी शिकणे आणि इंग्रजी माध्यम शिक्षण म्हणून निवडणे यात पालकांची गल्लत होते. इंग्रजी शिकण्यासाठी इंग्रजी माध्यम निवडणे खरेच गरजेचे आहे का?

इंग्रजी शिकण्यासाठी संपूर्ण शिक्षणच इंग्रजीतून घेणे योग्य आहे का? याचा विचार पालक करत नाहीत. मातृभाषेतून शिक्षण घेऊनही चांगले इंग्रजी शिकता येते हेच पालक विसरत चालले आहे. मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची नैसर्गिक पद्धत आहे. मातृभाषा ही खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा आहे. ती भाषा मुलाला तो आईच्या पोटात असल्यापासून ऐकायला मिळते. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने मुलाची मानसिक वाढ परिपूर्ण होते कारण ते मूल ज्या वातावरणाचा भाग आहे त्या वातावरणाचे प्रतिबिंब त्याला मातृभाषेत दिसते त्यामुळे मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची आदर्श पद्धत आहे. सांस्कृतिक, सामाजिक मूल्यांची रुजवन फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते.

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात माय, माती, मातृभाषा आणि मातृभूमी यांचे अनन्यसाधारण महत्व असते. माय जन्म देते, माती भरण पोषण करते, मातृभूमी आसरा सुरक्षा देते आणि मातृभाषा योग्य संस्कार करते. या संस्काराच्या शिदोरीवरच प्रत्येक व्यक्तीचे जीवन सुखी व समृद्ध होते. म्हणून किमान प्राथमिक आणि माध्यमिक स्तरांवर तरी शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषा असली पाहिजे असे अनेक भाषातज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ तसेच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या राष्ट्रीय व जागतिक पातळीवरील संस्था ओरडून सांगत आहेत. सुरवातीला एकदा मातृभाषेतून मूलभूत शिक्षण घेतल्यावर नंतर इंग्रजी अथवा इतर परकीय भाषा गरजेनुसार आत्मसात करणे, त्यांचा काळ परिस्थितीनुसार वापर करणे यास कोणाचीही काहीही हरकत असण्याचे कारण नाही. शिक्षण प्रणालीतून असे शिक्षण दिले पाहिजे की शिक्षण घेऊन बाहेर पडेल त्याला तो राहत असलेल्या प्रदेशातील पर्यावरणाची जाणीव असेल, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय जबाबदारीचे त्याला भान असेल देशाला भेडसावणाऱ्या समस्या व आव्हाने ओळखून त्याचा सामना करण्यास तो समर्थ असेल.

युनेस्को ही युनोची शैक्षणिक क्षेत्रात काम करणारी उपसंस्था आहे. युनेस्कोने केलेल्या संशोधनातून मातृभाषेतून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची आकलनशक्ती व गुणवत्ता ही मातृभाषेतर माध्यमातून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा कितीतरी चांगली व सरस असते असे आढळून आले आहे. महात्मा गांधी म्हणतात मातृभाषा शिक्षणाचे योग्य माध्यम आहे. मातृभाषेतूनच मुलांचा भावनिक आणि सामाजिक विकास होऊ शकतो. सांस्कृतिक व सामाजिक मूल्यांची पेरणी फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ अनिल काकोडकर म्हणतात, मातृभाषाच मुलांच्या स्वाभाविक शिक्षणाचे माध्यम असून त्याच भाषेतून त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. इंग्रजी माध्यमाचा विचार केला तर इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे. इंग्रजीवर प्रभुत्व मिळवलेल्या मुलांना सर्वच क्षेत्रात संधी उपलब्ध होईल असे पालकांना वाटते म्हणून पालक इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुलांना घालत असतील असे जरी मान्य केले तरी इंग्रजी माध्यमांच्या शाळेतून शिकलेले सर्वच मुले यशस्वी होतात असेही नाही.

उलट आज जे उच्चपदावर पोहचलेले मान्यवर आहेत मग ते डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक, प्राध्यापक, साहित्यिक असोत की शास्त्रज्ञ, उद्योजक, नेते, अभिनेते सर्वच मराठी भाषेतून शिकलेले आहेत. आयएएस,आयपीएस, आयएफएस यांची जर यादी पाहिली तर त्यातील ९५ टक्के अधिकाऱ्यांचे शिक्षण मातृभाषेतूनच झाले आहे. मागील काही वर्षात स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक संख्या मातृभाषेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचीच आहे. इंग्लंड, अमेरिका, फ्रांस, जर्मनी, चीन, जपान, रशिया यासारख्या प्रगत देशातही मातृभाषेतूनच शिक्षण दिले जाते. या देशातील पालक जाणीवपूर्वक आपल्या मुलांना मातृभाषेतून शिक्षण देतात. फिनलँड सारखा देश की ज्या देशाच्या शिक्षण पद्धतीचे अनुकरण प्रगत राष्ट्रही करतात त्या देशातही मातृभाषेतून शिक्षण दिले जाते.

महाराष्ट्राबाबत बोलायचे झाले तर मुलांना इंग्रजीचे डोस पाजले तर इथला मराठी भाषेचा समृद्ध ठेवा लुप्त होईल. मुलांमध्ये, राष्ट्राभिमान, राष्ट्रीय एकात्मता, चांगल्या संस्काराचे रोपण करायला मातृभाषाच कामी येईल. शिक्षणात मातृभाषेमुळे व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. मातृभाषा ही संस्काराचा आणि संस्कृतीचा मानबिंदू आहे. जितक्या सहजतेने मूल मातृभाषेतून शिकते तितक्या सहजतेने इंग्रजीतून शिकत नाही म्हणून मातृभाषेतून शिक्षण हेच खरे शिक्षण आहे.

**-श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५

# सर्वज्ञ चक्रधर स्वामींचे मानवमुक्तीचे तत्त्वज्ञान आजही समाजहिताचेच –प्राचार्य डॉ. मा. मा. जाधव



**नांदेड** –सर्वज्ञ चक्रधर स्वामींनी इ.सनाच्या अकराव्या शतकात मानवमुक्तीचे तत्त्वज्ञान मांडून ते समाजात रूजविण्याचा अविरत प्रयत्न केला. सामाजिक समतेची चळवळ ही महानुभाव पंथापासून सुरू झाली. संविधानाची मूल्ये ही मानवतेची मूल्ये आहेत. ती आपण म हानुभाव साहित्यातून घेतली आहेत. आज ती आपण जपली पाहिजेत, असे मत प्राचार्य डॉ. मा. मा. जाधव यांनी व्यक्त केले. ते डॉ. संजय जगताप लिखित सर्वज्ञ संचित ग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

महानुभव साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. संजय जगताप यांच्या सर्वज्ञ संचित या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा नुकताच नांदेड येथील यशवंत महाविद्यालयाच्या ग्रंथालयात थाटात संपन्न झाला. हा ग्रंथ सायास पब्लिकेशन नांदेड यांनी प्रकाशित केला आहे.

प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष तथा बहिर्जी स्मारक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मा. मा. जाधव होते तर मेरठ उत्तर प्रदेश येथील डी. लीट पदवी प्राप्त विचारवंत, महानुभाव साहित्याचे व्यासंगी अभ्यासक डॉ. बाबासाहेब बीडकर यांच्या हस्ते या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. सर्वज्ञ संचित प्रकाशन सोहळ्याचे प्रास्ताविक संयोजन समितीचे सदस्य प्रा. डॉ. माधव जाधव यांनी केले. याप्रसंगी लेखक डॉ. संजय जगताप यांनी या ग्रंथाच्या निर्मितीविषयीची भूमिका सविस्तर विशद केली. यानंतर आय. आर. एस. प्रशासकीय अधिकारी अंकेत जाधव, मराठी भाषा विद्यापीठ रिद्धीपूर जि. अमरावती येथील अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे, अमरावती येथील महानुभव साहित्याचे अभ्यासक प्रा. संदीप तडस व नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूरच्या चक्रधर स्वामी अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. भारतभूषण शास्त्री यांनी या ग्रंथावर समयोचित भाष्य केले. समकाळातील या ग्रंथाचे महत्त्व, या ग्रंथातील सामर्थ्य स्थळे, लेखकाचा दृष्टिकोन आणि वाचकांनी हा ग्रंथ का वाचावा याबद्दल अतिशय अभ्यासपूर्ण मांडणी या अभ्यासकांनी केली.

सर्वज्ञ संचित या चिंतनशील ग्रंथाची निर्मिती केल्याबद्दल प्रा. डॉ. संजय जगताप यांचे डॉ. बाबासाहेब बिडकर यांनी कौतुक केले व हा ग्रंथ महत्वपूर्ण असल्याचे मत व्यक्त केले.

अध्यक्ष स्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. मा.मा. जाधव म्हणाले की, अशा ग्रंथाची निर्मिती करण्यासाठी लेखकाचा त्या विषयाचा अभ्यास, त्याची एक विशिष्ट भूमिका असावी लागते आणि त्यांच्याकडे धाडस असावे लागते. प्रसंगी असे विचार रुजवण्यासाठी त्याची किंमतही मोजावी लागते. ते धाडस संजय जगताप यांनी केले आहे.

यावेळी उपस्थितांचे आभार सौ. छाया जगताप यांनी मानले.

# नांदेड येथे पीएलएफएस व एएसयूएसई राष्ट्रीय सर्वेक्षणाचा शुभारंभ

## नागरिकांनी सर्वेक्षणास सहकार्य करावे –अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड

**नांदेड (प्रतिनिधी)**– सांख्यिकी आणि कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय भारत सरकार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागामार्फत MahaSTRIDE प्रकल्प अंतर्गत राज्यात जून २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीत नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण आणि असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण राबविण्यात येणार आहे.

या सर्वेक्षणाच्या कामाचा शुभारंभ जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड यांच्या हस्ते माहितीपत्रकाचे विमोचन करून करण्यात आला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, सांख्यिकी अधिकारी श्रीमती प्रज्ञा पांढरे तसेच अन्वेषक आणि पर्यवेक्षक उपस्थित होते.

केंद्र शासनाच्या धर्तीवर अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन या सर्वेक्षणात सहभागी होत आहे. या सर्वेक्षणातून मिळणारी आकडेवारी शासनाच्या विविध योजना आणि धोरणे तयार करण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे.

PLFS सर्वेक्षणातून रोजगार-बेरोजगारी, महिला कामगारांचा सहभाग, स्वयंरोजगार आणि असंघटित रोजगार याबाबत अद्ययावत व विश्वासार्ह माहिती उपलब्ध होणार आहे.

SUSE सर्वेक्षणातून उत्पादन, व्यापार आणि सेवा क्षेत्रातील (बांधकाम क्षेत्र वगळून) असंघटित उद्यमांची संख्या, रोजगाराचे प्रकार (पगारी/स्वयंरोजगारी), कार्यरत कामगारांची संख्या, प्रति कामगार व प्रति उद्यम स्थूल मूल्यवृद्धी, उत्पादकता आणि वेतन यांसारख्या महत्त्वपूर्ण आर्थिक निर्देशकांची माहिती प्राप्त होणार आहे.

या माहितीच्या आधारे राज्य व जिल्हा उत्पन्नाचा अंदाज बांधणे तसेच शासनाच्या नियोजन व धोरणनिर्मितीस मदत होणार असल्याचे अपर जिल्हाधिकारी डॉ. गायकवाड यांनी सांगितले. त्यांनी नागरिकांना सर्वेक्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन केले.

सर्वेक्षणासाठी अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयामार्फत Ipsos Research Private Limited या संस्थेने नियुक्त केलेले अन्वेषक व पर्यवेक्षक निवडक नमुना पद्धतीने निवडलेल्या कुटुंबे आणि उद्योगांना भेट देऊन मुलाखतीद्वारे माहिती संकलित करणार आहेत. संकलित करण्यात येणारी वैयक्तिक माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार आहे.

सर्वेक्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य व परिपूर्ण माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाणे आणि जिल्हा सांख्यिकी कार्यालयाच्या वतीने सांख्यिकी अधिकारी श्रीमती प्रज्ञा पांढरे यांनी केले आहे.

# पूर्णा रेल्वे स्थानकावरील नवीन पादचारी उड्डाणपूल कामासाठी वाहतूक ब्लॉक

**नांदेड (प्रतिनिधी)** –दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील पूर्णा रेल्वे स्थानकावर १२ मीटर रुंदीच्या नवीन पादचारी उड्डाणपुलाच्या बांधकामासाठी प्लॅटफॉर्म क्रमांक २/३ वरील गँगवे आणि सरळ रॅम्पच्या पायाभरणीचे काम हाती घेण्यात येणार आहे. या कामासाठी प्रत्येकी ३ तासांचे तीन वाहतूक व वीज ब्लॉक मंजूर करण्यात आले आहेत.

सदर ब्लॉक शनिवार, दि. १३ जून २०२६, मंगळवार, दि. १६ जून २०२६ आणि शनिवार, दि. २० जून २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २ वाजेपर्यंत (१८० मिनिटे) घेण्यात येणार आहेत.

या कालावधीत खालील-प्रमाणे परिचालन व्यवस्था करण्यात आली आहे.

गाडी क्रमांक २२७०९ नांदेड-आंबअम्दौरा एक्सप्रेस दि. १६ जून २०२६ रोजी प्लॅटफॉर्म क्रमांक ४ वरून हाताळण्यात येईल.

गाडी क्रमांक १७६४० अकोला-काचीगुडा इंटरसिटी व १७६४२ नरखेड-काचीगुडा इंटरसिटी या गाड्या प्लॅटफॉर्म क्रमांक ४ वरून हाताळण्यात येतील.

गाडी क्रमांक १७६६१ ला चुडावा स्थानकावर ३० मिनिटे नियंत्रित करण्यात येईल व ती प्लॅटफॉर्म क्रमांक ४ वरून हाताळण्यात येईल, असे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.

# विष्णुपुरी येथील श्री सत्संग सेवा समितीच्यावतीने शिवम शुक्ल यांच्या शिवपुराण कथेस उत्साहात प्रारंभ

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– विष्णुपुरी येथील श्री सत्संग सेवा समितीच्या वतीने शिवपुराण कथा महोत्सवाला उत्साहात प्रारंभ झाला आहे.



प्रारंभी शिवपुराण कथाकार शिवम शुक्ल महाराज यांनी काळेश्वर मंदिर येथे महाआरती करून दर्शन घेतल्यानंतर काळेश्वर मंदिर देवस्थानच्यावतीने माजी खासदार तथा अध्यक्ष भास्करराव पाटील खतगावकर व माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा यांच्या वतीने शिवम शुक्ल यांचा सत्कार करण्यात आला. नंतर शिवपुराण कथेला प्रारंभ झाला.

शिवपुराण कथेचे आयोजन १४ ते २० जून दरम्यान दररोज दुपारी ३ ते ६ यावेळेत करण्यात आले आहे. पहिल्या दिवशी महात्मय महत्व सांगण्यात आले. या कार्यक्रमासाठी श्री सत्संग सेवा समिती काळेश्वर समिती अध्यक्ष माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांच्या समितीचे पदाधिकारी माजी ओमप्रकाश पोकर्णा, धारोजी हंबर्डे, बालाजी हंबर्डे, उत्तम हंबर्डे, किशोर उपाध्याय शर्मा, राजेंद्र शुक्ला, बालाजी हंबर्डे, सतीश भेंडेकर यांच्यासह गावातील सेवानिवृत्त उपनिरीक्षक माणिकराव हंबर्डे, संतोष ऊर्फ गोलू हंबर्डे आदी समिती पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले. यावेळी महिला भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

अधिक मासनिमित्ताने १४ जुन रोजी पंचक्रोशीतील गोदावरी नदीच्या काठावर असलेल्या स्वयंभू काळेश्वर मंदिर येथे सकाळपासून मोठ्या प्रमाणात महिला भाविकांनी गोदावरी नदीत स्नान करून काळेश्वर मंदिर येथे दर्शन घेतले.

अधिक मास महिन्याच्या शेवटच्या दिवशी पंचक्रोशीतील अनेक गावांतील व शहरातील महिला भाविकांनी सकाळपासून मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. यावेळी मंदिर समितीच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# श्री गुरु गोबिंदसिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेत नेत्रदान जनजागृती कार्यक्रम संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)** –समाजामध्ये नेत्रदानाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने श्री गुरु गोबिंदसिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालयात नेत्रदान जनजागृती कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमास संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे, डॉ. अभिजित नांदेडकर यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख, अधिष्ठाता, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी नेत्रदानाचे महत्त्व, अंधत्व निवारणासाठी त्याचे योगदान तसेच मृत्यूनंतरही इतरांना प्रकाश देण्याची संधी याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तज्ज्ञ वक्त्यांनी नेत्रदानासंबंधी समाजातील गैरसमज दूर करीत नेत्रदान प्रक्रियेची माहिती उपस्थितांना दिली.

याप्रसंगी डॉ. मनेश कोकरे यांनी विद्यार्थ्यांनी सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून जनजागृती उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले

कार्यक्रमा दरम्यान नेत्रदानाविषयी माहितीपर सादरीकरण करण्यात आले. उपस्थितांना नेत्रदानाची शपथ घेण्यासाठी प्रेरित करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि कर्मचाऱ्यांमध्ये नेत्रदानाबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण झाला. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. माधव वैद्य यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालय प्रशासन, विभागप्रमुख, अधिष्ठाता, प्राध्यापक, कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी नेत्रदानाचा संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प केला. नेत्रदान हे महादान असून, मृत्यूनंतरही दुसऱ्यांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करण्याचे सामर्थ्य त्यात आहे, असा प्रेरणादायी संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

# शेतकरी कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी द्या –भगवानराव आलेगावकर

**नांदेड (प्रतिनिधी)** –शेतकरी कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी द्या, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना जाहीर केली असून, योजनेतील जाचक अटी-शर्ती बघता ही योजना म्हणजे कर्जमाफी नसून कर्जवसुली आहे. यामुळे लाखो शेतकरी वंचित राहणार असल्याचे स्पष्ट आहे. परिणामी संबंधित शासन निर्णय बदलण्याची आवश्यकता आहे, असे आलेगावकर यांनी निवेदनात म्हटले आहे.

या योजनेत सन २०१९ ते २०२६ दरम्यान शेतकऱ्यांनी घेतलेले अल्पमुदत पीककर्जाची २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला. परंतु ज्या शेतकऱ्यांनी २०१९ च्या महात्मा ज्योतीराव फुले कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतला आहे त्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांची कर्जमाफी मिळणार आहे. २०१९ साली राज्यातील सुमारे ३३ लाख शेतकऱ्यांनी कर्जमाफी योजनेचा लाभ घेतला होता. याचाच अर्थ यंदाच्या कर्जमाफीतून ३३ लाख शेतकऱ्यांना संपूर्ण लाभ मिळणार नाही, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या योजनेत ज्या शेतकऱ्यांचे कर्ज २ लाखांहून अधिक आहे त्यांनी एकवेळ समझोता अंतर्गत २ लाखांवरील रक्कम भरली तरच त्यांना २ लाख रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांनी २०१९ च्या कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतला आहे आणि सध्या त्यांचे कर्ज ५० हजारांहून अधिक आहे त्यांनी उर्वरित रक्कम भरल्यानंतरच त्यांना ५० हजार रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. या योजनेतील अटीनुसार ज्या शेतकऱ्यांनी सन २०२२-२३, सन २०२३-२४, सन २०२४-२५ यापैकी कोणत्याही दोन वर्षातील पीक कर्जाची वेळेत परतफेड केली असेल त्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे. परंतु हा प्रोत्साहनपर लाभ मिळवण्यासाठी त्या शेतकऱ्याने सन २०२५-२६ आणि सन २०२६-२७ चे पीककर्ज भरले असणे आवश्यक आहे.

२०१९ च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांसाठी केवळ ५० हजार रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीच्या मर्यादेची अट रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी द्यावी, एकवेळ समझोता योजनेत लाखांहून अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना २ लाखांवरील रक्कम आधी भरण्याची अट न घालता सरकारने सरसकट २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी करावी यासह अन्य काही मागण्यांचा पाठपुरावा भगवानराव आलेगावकर यांनी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्य सरकारकडे निवेदनाद्वारे केला आहे.

# सुसंस्कारांच्या विचारांची पेरणी करणारे पुस्तक म्हणजे 'शहाणी झाली प्रजा...'; साहित्यिक आनंद पुपलवाड यांचे उद्गार

**नांदेड (प्रतिनिधी)**– आज मुलांना उत्तम पुस्तकांच्या वाचनाची आवड लावणे आणि त्यांच्यात उत्तम संस्कारांच्या विचारांची पेरणी करणे गरजेचे आहे, आणि ही दोन्ही कामे बालसाहित्यिक दत्ता डांगे यांनी लिहिलेले 'शहाणी झाली प्रजा निवडू लागली राजा' हे पुस्तक करते, असे उद्गार प्रसिद्ध साहित्यिक आनंद पुपलवाड यांनी काढले.



इसाप प्रकाशनाने प्रकाशनासाठी सिद्ध केलेल्या या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ नांदेड येथे आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आनंद पुपलवाड हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध बालसाहित्यिक पंडित पाटील हे होते तर आनंदी स्वप्नील अंजनीकर या बालिकेच्या हस्ते प्रकाशन आयोजित केले होते. प्रारंभी सरस्वती प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर आनंदी अंजनीकरच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. मनोगत लेखक दत्ता डांगे यांनी व्यक्त केले. आपल्या लिखाणाचा मौलिक ऐवज असलेला संदूक आपण आता अनेक वर्षांनंतर उघडला असून, यापुढे आपली काही पुस्तके पुस्तकप्रेमींसाठी सादर करणार असल्याचे सांगितले. यानंतर आनंदी हिने अशी लहान लहान गोष्टींची व सुंदर चित्रे असलेली पुस्तके आम्हाला खूप आवडतात. लेखकाने अशी खूप पुस्तके लिहावीत अशी भावना व्यक्त केली. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना पंडित पाटील यांनी म्हटले की, सुंदर आणि संपन्न अशी आणि सप्तरंगी वेधकपुस्तके असली की, बालकवर्ग त्याकडे आपोआप आकर्षिला जातो, आणि तोच नेमकेपणा दत्ता डांगे यांच्या कथालेखनात आणि प्रकाशनाच्या निर्मितीत आहे असे उद्गार त्यांनी काढले. अध्यक्षीय विचार मांडताना पुपलवाड पुढे म्हणाले की, दैववादाकडून वास्तवाकडे, अज्ञानाकडून सज्ञानाकडे, आणि अंधकारातून प्रकाशाकडे बालकात विचार पेरणारे हे पुस्तक बालकांसाठी महत्त्वाचे कार्य करील.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कादंबरीकार अशोक कुबडे यांनी केले. कार्यक्रमास प्रा. जगदीश कदम, देवीदास फुलारी, प्रा. भगवान अंजनीकर, गिरीश कहाळेकर, विजयकुमार चित्तरवाड, सौ. संजीवनी डांगे, सौ. निर्मला मंदाडे, शंकर मंदाडे, बाबू मंदाडे आदी उपस्थित होते.

# अध्यात्मिक वारसा जतनासाठी 'श्री राहेरक्षेत्र महात्म्य' पुस्तकाला आर्थिक बळ

**नांदेड (प्रतिनिधी)**– 'श्री राहेरक्षेत्र महात्म्य' या पुस्तकाच्या प्रकाशन व प्रसारासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने ५० हजारांची आर्थिक मदत देण्यात आली. महामंडळाचे अध्यक्ष तथा कॅबिनेट मंत्री दर्जा प्राप्त कॅप्टन आशिष दामले यांच्या पुढाकारातून नृसिंह मंदिर देवस्थान समितीचे विश्वस्त संतोष जोशी आणि धनंजय देशमुख यांना अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांच्या हस्ते ५० हजारांचा धनादेश प्रदान करण्यात आला.



सात दिवसांपासून सुरू असलेल्या भागवत कथा ज्ञानयज्ञाच्या समारोपानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात हा मदतनिधी सुपूर्द करण्यात आला. यावेळी आमदार प्रतिनिधी पुनमताई पवार, भागवताचार्य मंदारबुवा रामदासी, अभिनव भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब पांडे येवतीकर, अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे मराठवाडा कार्याध्यक्ष बाळासाहेब पांडे मांजरमकर, संतोष कुलकर्णी, बंडूपंत कुंटूरकर, रमाकांत जोशी, अनंत राखे, राजेश कुलकर्णी यांच्यासह परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना निखिल लातूरकर यांनी कॅप्टन आशिष दामले यांच्या कार्याचा गौरव केला. धार्मिक, सामाजिक आणि विधायक उपक्रमांना परशुराम आर्थिक विकास महामंडळामार्फत सातत्याने आर्थिक पाठबळ दिले जात असून, अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले. नांदेड जिल्ह्यात विविध विधायक उपक्रमांसाठी आतापर्यंत सुमारे सात लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

'श्री राहेरक्षेत्र महात्म्य' हे पुस्तक केवळ धार्मिक माहितीपुरते मर्यादित नसून राहेरक्षेत्राचा इतिहास, परंपरा आणि अध्यात्मिक वारसा भावी पिढ्यांपर्यंत पोहोचविणारे महत्त्वाचा दस्तावेज ठरणार आहे. या माध्यमातून राज्यातील तसेच बाहेरील भाविक आणि पर्यटकांना राहेरक्षेत्राची ओळख होऊन धार्मिक पर्यटनाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश जोशी यांनी केले तर आभार धनंजय देशमुख यांनी मानले.

# उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभाग फेस्कॉमच्या ज्येष्ठ नागरिक चळवळीला उत्स्फूर्त प्रतिसाद

## शासनाने ऐतिहासिक निर्णय घ्यावा –डॉ. हंसराज वैद्य

**नांदेड (प्रतिनिधी)**– उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभाग फेस्कॉम नांदेडच्या वतीने उभारण्यात आलेल्या ज्येष्ठ नागरिक हक्क चळवळीला समाजातील विविध घटकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. ही चळवळ आता खऱ्या अर्थाने लोकचळवळ बनत असल्याचे मत ज्येष्ठ नागरिक नेते डॉ. हंसराज वैद्य यांनी व्यक्त केले आहे.

देशाच्या स्वातंत्र्यलढ्या-पासून राष्ट्रनिर्मितीपर्यंतचे संपूर्ण आयुष्य समाजासाठी आणि देशासाठी समर्पित करणारे ज्येष्ठ नागरिक साठीनंतर विविध व्याधींनी ग्रस्त होतात. उत्पन्नाची साधने संपुष्टात येतात, शारीरिक क्षमता कमी होते आणि अनेकदा कुटुंब व समाजातही त्यांची उपेक्षा होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. संविधानाने प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला असून, वृद्धापकाळातील आर्थिक, सामाजिक आणि शारीरिक संरक्षणाची जबाबदारी शासनाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या पार्श्वभूमीवर १० जून रोजी ज्येष्ठ नागरिकांच्या नागरी आणि घटनात्मक हक्कांविषयी जनजागृती करण्यासाठी 'नागरी हक्क संरक्षण प्रसार लक्षवेधी मागणी फेरी' काढण्यात आली होती. ज्येष्ठ नागरिकांचे उर्वरित आयुष्य सुख, समाधान आणि सन्मानाने जावे, यासाठी शासनाने ठोस पावले उचलावीत, हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

फेस्कॉमने शासनाकडे अनेक महत्त्वपूर्ण मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांना 'राष्ट्रीय संपत्ती' म्हणून घोषित करणे, जागतिक निकषांप्रमाणे ६० वर्षे वयाची मर्यादा स्वीकारणे, सर्व योजना साठ वर्षांवरील नागरिकांना लागू करणे, २००७ चा कायदा, २०१० चे नियम व २०१३ चे धोरण आणि कायदा प्रभावीपणे राबविणे, तसेच विधान परिषद आणि राज्यसभेवर ज्येष्ठ नागरिकांमधून एक महिला व एक पुरुष प्रतिनिधी नियुक्त करण्याची तरतूद करणे यांचा समावेश आहे.

याशिवाय स्वतंत्र 'ज्येष्ठ नागरिक कल्याण मंत्रालय', 'ज्येष्ठ नागरिक आयोग', प्रत्येक जिल्ह्यात ज्येष्ठ नागरिक भवन व विरंगुळा केंद्र, 'लाडके मायबाप योजना', तसेच विस्थापित, गरीब, गरजवंत, दुर्लक्षित, उपेक्षित, वंचित, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, कामगार, विधवा व दिव्यांग ज्येष्ठ नागरिकांना दरमहा किमान पाच हजार रुपये सन्मानधन देण्याची मागणी करण्यात आली आहे.

सुरक्षित, आरक्षित आणि मोफत प्रवास, करमुक्ती, संपूर्ण आरोग्य विमा आणि विविध सुविधा सन्मानपूर्वक उपलब्ध करून देण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या आचारसंहितेच्या काळात व कलम १४४ लागू असतानाही जिल्हा व पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने अत्यंत शांततामय आणि स्वयंशिस्तीने पार पडलेल्या या फेरीत आठ ते दहा हजारांहून अधिक ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले. हा एक ऐतिहासिक आणि अनुकरणीय उपक्रम ठरल्याचे डॉ. वैद्य यांनी नमूद केले.

या चळवळीला मराठवाडा लोकविकास समन्वय संघर्ष समिती नांदेडचे संस्थापक अध्यक्ष के. के. जांबकर व त्यांचे सहकारी तसेच बहुउद्देशीय सीनियर सिटीजन आधार संस्था व जनहितार्थ सेवा समिती, घुग्घूस (जि. चंद्रपूर)चे पुंडलिकराव कोठे व त्यांचे सहकारी यांच्यासह विविध संघटनांनी जाहीर पाठिंबा दिला.

# शिवार

# लिंबूवर्गीय फळबाग

**नवीन लिंबूवर्गीय फळबाग लागवड करताना नियोजनबद्ध पद्धतीने सुरुवातीच्या टप्प्यात योग्य सिंचन, पीक पोषण आणि तापमान व्यवस्थापन करण्याची आवश्यकता असते. संभाव्य परिणामांचा विचार करूनच फळबाग लागवडीचे नियोजन करणे आवश्यक आहे. या वर्षी पावसाचे असमान वितरण, उष्णतेच्या लाटा, दीर्घ कोरडे कालखंड आणि पाण्याच्या उपलब्धतेवर होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत नवीन लिंबूवर्गीय फळबाग लागवड करताना नियोजनबद्ध पद्धतीने निर्णय घेणे गरजेचे आहे. संत्रा, मोसंबी, लिंबू यांसारख्या लिंबूवर्गीय पिकांना सुरुवातीच्या टप्प्यात योग्य पाणी, पोषण आणि तापमान व्यवस्थापनाची आवश्यकता असते.**



## लागवडीपूर्वी पाण्याचे नियोजन

लिंबूवर्गीय फळबाग लागवडीपूर्वी सर्वप्रथम पाण्याच्या उपलब्धतेचा विचार करावा. अनेक भागांत पावसाचा खंड पडण्याची शक्यता असल्याने केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहणे धोकादायक ठरू शकते. शेततळे, सिमेंट नाला बांध यांसारख्या जलसंधारण उपाययोजना कराव्यात. उपलब्ध विहीर, बोअरवेल किंवा तलावातील पाण्याचा साठा तपासूनच लागवडीचा निर्णय घ्यावा. लागवडीमध्ये ठिबक सिंचन प्रणालीचा वापर प्रामुख्याने करावा. पावसाळ्यापूर्वी शेतातील पाणी अडविण्यासाठी व्यवस्था करावी.

## लागवडीसाठी खड्डे

लागवडीपूर्वी जमिनीची लोखंडी नांगराने खोल नांगरट करून कुळवाच्या दोन-तीन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. संत्र्याच्या दोन झाडांतील अंतर जमिनीच्या प्रकारावर अवलंबून असते. झाडांतील अंतर हलक्या व मध्यम जमिनीत ५ बाय ५ मीटर तर भारी जमिनीत ६ बाय ६ मीटर ठेवावे. संत्रा कलमांची लागवड चौरस पद्धतीने केली जाते. त्याकरिता जमिनीची आखणी करून लागवडीच्या जागी १ बाय १ बाय १ मीटर आकाराचे खड्डे खोदावेत. मे महिन्यातील कडक उन्हात उष्णतेने खड्ड्यातील सूत्रकृमी, कीटक आणि बुरशी यांचा नाश होतो. काढलेले खड्डे माती व चांगले कुजलेले शेणखत २:१ या प्रमाणात घेऊन त्याचे मिश्रण २ किलो सिंगल सुपर फॉस्फेट चांगले मिसळून या मिश्रणाने खड्डे जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत भरावेत. खड्ड्याच्या तळाशी पालापाचोळ्याचा १५ ते २० सेंमी जाडीचा थर द्यावा. खड्डे जमिनीवर साधारण १५ सेंमी उंच भरावेत. खड्ड्यात कलमांची लागवड केल्यावर मुळांची वाढ खड्ड्याच्या खोलीपर्यंत झपाट्याने होऊन झाडांची अन्नरस घेण्याची क्षमता वाढते.

## लागवड नियोजन

हलक्या ते मध्यम पोताच्या जमिनीत संत्रा लागवडीसाठी जंबेरी आणि भारी पोटाच्या जमिनीत रंगपूर लिंबू खुंटावरील कलमे निवडावीत. लागवडीसाठी योग्य कलमांची निवड करून रिमझिम पाऊस असताना लागवड करावी. किमान १०० मि. मी. पाऊस झाल्यानंतर लागवडीचे नियोजन करावे. मध्यम ते हलक्या जमिनीत लागवडीसाठी जंबेरी, तर भारी जमिनीसाठी रंगपूर लिंबू या खुंटावरील संत्रा कलम निवडावे. कलमे लावताना, डोळे भरलेला भाग पृष्ठभागापासून ७ ते ८ इंच (२० ते २५ सेंमी) वर राहील याची काळजी घ्यावी. कलमे रोपवाटिकेत जितकी खोल असतील, तेवढीच खोल लावावीत. मुळ्या दुमडणार नाही याची काळजी घ्यावी. लागवडीपूर्वी कलमांची खालच्या बाजूची जवळ जवळ अर्धी पाने काढून टाकावीत. इजा झालेली मुळे काळजीपूर्वक काढून टाकावीत. बाजूची इतर फूट सुद्धा काढून टाकावी. मुळांच्या संख्येचे आणि पानांच्या संख्येचे योग्य प्रमाण असावे. पॉलिथिन पिशवीतील कलम असेल तर लागवड करताना मातीचा गोळा फुटणार नाही याची काळजी घ्यावी. शक्यतोवर ८ बाय १२ इंच आकाराच्या पिशवीतील कलमांची निवड करावी. प्रत्येक कलमास आधारासाठी पश्चिम बाजूस ६ इंच (१५ सेंमी) अंतरावर ४ ते ५ फूट (१.५ ते २ मीटर) उंचीची बांबूची काठी रोवून कलमास आधार द्यावा.

### जातींची निवड

स्थानिक परिस्थितीत तग धरणाऱ्या आणि तुलनेने पाण्याच्या ताणास सहनशील जातींची निवड महत्त्वाची ठरते. हलक्या जमिनीत दुष्काळ सहनशील रूटस्टॉकवर तयार केलेली रोपे फायदेशीर ठरू शकतात. संत्र्यासाठी शासकीय मान्यताप्राप्त आणि प्रमाणित रोपवाटिकेतील रोगमुक्त रोपांची खरेदी करावी. स्थानिक हवामानाशी जुळवून घेणाऱ्या सुधारित जातींचा वापर करावा.

### लागवडीचे नियोजन परिस्थितीनुसार

अनियमित पावसाच्या पार्श्वभूमीवर पारंपरिक वेळेपेक्षा लागवडीचे नियोजन परिस्थितीनुसार करणे आवश्यक आहे. पहिल्या पावसानंतर लगेच लागवड करण्याऐवजी पावसाची सातत्यपूर्ण स्थिती पाहावी. जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाल्यानंतरच लागवडीचे नियोजन करावे. अत्यंत उष्ण किंवा कोरड्या कालावधीत नवीन रोपे लावणे टाळावे. लागवडीनंतर लगेच ठिबकद्वारे हलके सिंचन द्यावे.



## पावसाळ्यात घ्यावयाची काळजी

पावसाळ्यात संत्रा बागांमधील जास्तीचे पाणी बागेबाहेर काढण्यासाठी उताराच्या दिशेने व प्रत्येकी दोन ओळींनंतर ३० सेंमी खोलीचे व ४५ सेंमी रुंदीचे चर खोदावेत. त्यातून पावसाच्या अतिरिक्त पाण्याचा निचरा लवकर व प्रभावीपणे होईल. झाडाच्या आळ्यात पाणी साचू नये म्हणून जमीन सपाट करावी. लागवडीनंतर पावसाचा खंड पडल्यास ठिबक सिंचन पद्धतीने पाणी देण्याची व्यवस्था करावी. कलमांना नवीन जोमदार फुटवे आल्यावरच माती परीक्षणानुसार रासायनिक खतांची मात्रा द्यावी. कलमावर नवीन फूट आल्यानंतर कलमा रुजल्या असे समजावे. कलमेच्या डोळ्याखाली खुंटावर असलेली फूट वेळीच काढावी. डोळे फांदीवरील कोणतीच फूट काढू नये. इंडो-इस्त्राईल लागवड पद्धतीमध्ये गादी वाफ्यावर ६ बाय ३ मी. अंतरावर लागवड केली जाते. या पद्धतीमध्ये पावसाच्या पाण्याचा निचरा योग्य होऊन मुळांची वाढ भरपूर होते आणि बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव अत्यल्प होतो. नवीन बागेत आंतरपिके घ्यावयाची असल्यास भुईमूग,उडीद, मूग, सोयाबीन ही पिके घ्यावीत. हिरवळीच्या खताकरिता धैंचा किंवा बोरूचे बी ४० किलो प्रति हेक्टर प्रमाणे पेरावे. नवीन बागेत खोल मुळे असलेली उदा. कपाशी, सूर्यफूल, तूर यांसारखी आंतरपिके घेऊ नयेत. लागवडीसाठीची कलमे निरोगी, जास्त उत्पादन व दर्जेदार फळे देणाऱ्या मातृवृक्षाचे डोळे वापरूनच तयार केलेली असावीत. कलमे किकरपानी, वेलीया किंवा पानसोट असलेल्या मातृवृक्षापासून तयार केलेली नसावीत. जंबेरी किंवा रंगपूर या खुंटावर २० ते २५ सेंमी उंचीवर बांधलेली कलमे निवडवीत. कलमांचे फाटे परिपक्व झालेले असावेत. फाट्यांवर पांढऱ्या बारीक रेषा असल्या, तर फाटे परिपक्व झाले असे समजावे. कलमे ६० ते ९० सेंमीपर्यंत सरळ वाढलेली असवीत. अति उंच कलम लागवडीसाठी वापरू नयेत. ती कलमे वेलिया प्रकारची असण्याची शक्यता असते.



**फळबाग लागवड यशस्वी होण्यासाठी लागवडीची पूर्वतयारी आणि नियोजन या बाबी महत्त्वाच्या आहेत. फळबागेचे नियोजन करताना जमिनीचा प्रकार, फळझाडांची निवड, बारमाही पाण्याची व्यवस्था, स्थानिक हवामानात येणाऱ्या फळझाडांची निवड, लागवडीपूर्वी माती, पाणी परीक्षण, दर्जेदार कलमांची उपलब्धता या बाबींचा विचार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.**

# नवीन फळबाग लागवड

फळबाग लागवड करताना जमिनीची प्रकार, जमिनीची खोली आणि मुरूम किती खोलीवर आहे? जमिनीचा निचरा कसा आहे? याचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक असते. फळबाग लागवडीसाठी उत्तम निचरा होणारी जमिनीची निवड अत्यंत महत्त्वाची असते. फळबागेसाठी कमीत कमी एक मीटर खोलीनंतर मुरमाचा थर असणारी जमीन निवडावी. भरपूर सेंद्रिय कर्ब, भुसभुशीत, मध्यम पोताच्या जमिनीचा सामू ६ ते ७.५ पर्यंत असावा. मुक्त चुनखडीचे प्रमाण १० टक्क्यांपेक्षा कमी असावे. जमिनीचा उतार २ ते ३ टक्क्यांपेक्षा जास्त नसावा. ज्या ठिकाणी फळबाग लावायची आहे, त्या ठिकाणच्या मातीचे परीक्षण करावे. जास्त खोल, क्षारयुक्त जमिनी, चोपण जमिनी यातून पाण्याचा योग्य निचरा होत नाही. अशा जमिनीत लागवड केल्यानंतर सुरुवातीला फळझाडे वाढल्यासारखी दिसली, तरी पुढे वाढीचा वेग मंदावतो, उत्पादन मिळत नाही. ज्या जमिनीत मुक्त चुनखडीचे प्रमाण १० टक्क्यांपेक्षा जास्त आहे, अशा जमिनीत फळबागेची वाढ होत नाही.

## जमिनीनुसार निवड

» हलकी ते मध्यम जमीन : अंजीर, पेरू, डाळिंब, कागदी लिंबू, द्राक्षे, पपई, सीताफळ, बोर, करवंद, कवठ, चिंच.
» मध्यम जमीन : चिकू, आंबा, संत्री, मोसंबी, काजू, नारळ.
» भारी जमीन : केळी.

## लागवडीचे अंतर

| फळझाडे | लागवड अंतर (मीटर) | हेक्टरी झाडे |
|---|---|---|
| आंबा, चिकू, चिंच, जांभूळ | १० बाय १० | १०० |
| नारळ | ७.५ बाय ७.५ | १७७ |
| आवळा | ७ बाय ७ | २०४ |
| पेरू | ६ बाय ६ | २७७ |
| | ३ बाय २ | १६६६ |
| बोर, लिंबू, मोसंबी | ६ बाय ६ | २७७ |
| सीताफळ | ५ बाय ५ | ४०० |
| डाळिंब | ४.५ बाय ३ | ७४० |
| अंजीर | ५ बाय ५ | ४०० |
| | ४.५ बाय ३ | ७४० |

## हवामानानुसार फळपिकांची निवड

महाराष्ट्रातील हवामान सर्व फळपिकांच्या लागवडीसाठी अत्यंत अनुकूल आणि पोषक आहे. त्यामुळे बहुतांश सर्व फळपिकांची यशस्वी लागवड करता येते. राज्याचा विचार करता पश्चिम महाराष्ट्रात आंबा, केळी, चिकू, पपई, नारळ अशा प्रकारची फळझाडे घेता येतात. पूर्वेकडील उष्ण व कोरड्या हवामानात संत्रा, मोसंबी, कागदी लिंबू, पेरू, द्राक्षे, डाळिंब यांसारखी फळझाडे घ्यावीत. कोकणसारख्या अति पावसाच्या भागात आंबा, काजू, चिकू, नारळ, फणस यासारखी फळझाडे घ्यावीत, तर अत्यंत कमी पावसाच्या भागात बोर, सीताफळ, आवळा, चिंच अशी कोरडवाहू फळझाडे घेण्याची शिफारस करण्यात येते. हवामानानुसार फळझाडांची लागवड न केल्यास फळे न येणे, फळे लागली तरी फळांची प्रत खालावणे, उशिरा फळे लागणे, रोग व किडींचा प्रादुर्भाव आदी समस्या उद्भवतात. त्यासाठी हवामानानुसार लागवड करणे आवश्यक आहे.

## माती, पाणी परीक्षण

फळबागेकरिता मातीचा नमुना घेताना जमिनीच्या प्रकारानुसार प्रातिनिधिक नमुना घ्यावा. सर्वप्रथम ३ बाय ३ बाय ३ फूट खोलीचा (१०० सें.मी.) किंवा मुरूम लागेपर्यंत खड्डा करून पृष्ठभागापासून प्रत्येक फुटातील प्रतिनिधिक नमुना घ्यावा. तो नमुना वेगवेगळ्या पिशव्यांमध्ये भरून प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावा. माती बरोबरच, पाण्याचेही रासायनिक परीक्षण करून घ्यावे. त्या अनुषंगानेच फळझाडांची निवड करावी. विहीर, कूपनलिकेचे पाणी क्षारयुक्त किंवा मचूळ असू नये, ते गोड असावे.

## पाण्याची उपलब्धता

बागायती फळझाडांना नियमित पाणी द्यावे लागते. बागायती फळझाडांची लागवड करताना बागेस सिंचनासाठी पुरेशा पाण्याची उपलब्धता आहे का, याचा विचार करूनच नियोजन करावे. कोरडवाहू फळपिकांना चांगल्या व समाधानकारक वाढीसाठी लागवडीच्या सुरुवातीस पहिली तीन ते चार वर्षे पाण्याची आवश्यकता असते. नारळ, सुपारी, केळी, पपई, चिकू यांना इतर फळझाडांपेक्षा जास्त पाणी लागते. वर्षाचे १२ महिने पाण्याची सोय असेल, तर बाराही महिने पाणी लागणाऱ्या फळझाडांची निवड करावी. आठ महिने पुरेल इतके पाणी उपलब्ध असेल तर पेरू सारख्या फळझाडांची लागवड करावी. पाणी फक्त सहा महिने पुरत असेल, तर सीताफळ, रामफळ, आवळा, बोर यांसारख्या कोरडवाहू फळझाडांची लागवड करावी.







### बागेची आखणी आणि अंतर

फळझाडांची आणि जागेची निवड झाल्यावर लागवडीसाठी आखणी करणे गरजेचे आहे. जमिनीची आखणी करण्यापूर्वी लागवडीची पद्धत ठरवावी. फळपिके लागवडीच्या चौरस, आयताकृती, त्रिकोणी, षटकोनी, उतार (कंटूर) अशा निरनिराळ्या पद्धती आहेत. चौरस पद्धत ही सर्वात सोपी, आखणीस अडचण नसणारी आणि उभ्या-आडव्या मशागतीस योग्य आहे. आंबा, पेरू, चिकू, संत्रा, मोसंबी इत्यादी फळझाडांची लागवड या पद्धतीने केली जाते. या पद्धतीमध्ये झाडांच्या रांगा काटकोन करून असतात. दोन झाडांतील आणि दोन रोपांतील अंतर सारखेच येत असल्यामुळे झाडे सर्व दिशांनी पाहिल्यास सारख्या अंतरावर दिसतात. या पद्धतीने लागवड करणे अत्यंत सुलभ असते.

### लागवडीसाठी खड्डे

फळझाडांची लागवड करताना योग्य अंतरावर चौरस पद्धतीने आखणी करून खड्डे खोदावेत. जमिनीचा मगदूर आणि फळझाडांच्या प्रकारानुसार खड्ड्याचा आकार ठरवावा. खड्डे खोदण्याचे काम उन्हाळ्यातच पूर्ण करावे. हलक्या जमिनीत व मोठ्या विस्ताराच्या फळझाडांसाठी मोठ्या आकाराचे खड्डे घ्यावेत. दीर्घायुषी झाडे असतील तर १ मी. बाय १ मी. बाय १ मी. आकाराचा खड्डा घ्यावा. मध्यम आकाराच्या झाडांना ७५ बाय ७५ बाय ७५ सेंमी आणि लहान झाडांना ६० बाय ६० बाय ६० सेंमी आकाराचे खड्डा घ्यावेत. जमीन डोंगर उताराची असेल, तर समपातळी रेषा काढून लागवड करावी.

## फळबागेसाठी खड्डा कसा भराल?

खड्डा खोदताना वरील व खालील थरातील माती वेगवेगळी टाकावी. खड्डे खोदल्यानंतर तीन आठवडे तापू द्यावेत, जेणेकरून सूर्यप्रकाशामुळे खड्ड्यांचे निर्जंतुकीकरण होईल. मे महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यात खड्डे पुन्हा भरावेत. खड्डे मातीने भरताना ते निर्जंतुकीकरण करून तळाला वाळलेला पालापाचोळा १५ सेंमी थरात भरावा. मातीमध्ये २० ते २५ किलो चांगले कुजलेले शेणखत, २ ते ३ किलो गांडूळ खत, २ ते ३ किलो निंबोळी पेंड, २५ ग्रॅम टायकोडर्मा, १५ ग्रॅम स्फुरद विरघळविणारे जिवाणू, २५ ग्रॅम अॅझोटोबॅक्टर हे मिश्रण मिसळून घ्यावे. खड्डा जमिनीच्या वर ५ ते ७ सेंमी उंच भरून ठेवावा. म्हणजे पावसाळ्याच्या सुरुवातीला लागवड करता येईल.

# पेरण्या खोळंबल्या; शेतकऱ्यांनी काय करावे?

**जून महिना अर्धा उलटूनही अनेक भागांत समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे खरीप हंगामातील पेरण्या रखडल्या असून शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. मात्र, अशा परिस्थितीत घाईघाईने पेरणी करण्याऐवजी शास्त्रशुद्ध नियोजन करणे आवश्यक आहे. कृषी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार काही बाबींची काळजी घेतल्यास संभाव्य नुकसान टाळता येऊ शकते.**

» अपुऱ्या पावसात पेरणीची घाई करू नका : केवळ एक-दोन सरी पडल्यामुळे पेरणी करू नये. जमिनीत किमान ७५ ते १०० मि. मी. इतका ओलावा साठलेला असल्याची खात्री झाल्यानंतरच पेरणी करावी. अन्यथा बियाणे उगवून पुन्हा कोरडे पडण्याचा धोका असतो.
» बियाण्यांचा अतिरिक्त साठा ठेवावा : पावसाचा अंदाज अनिश्चित असल्याने मूळ नियोजनापेक्षा २० ते २५ टक्के अतिरिक्त बियाणे उपलब्ध ठेवावेत. दुबार पेरणीची वेळ आल्यास त्याचा उपयोग होईल.
» अल्प कालावधीत येणाऱ्या वाणांची निवड करा : पाऊस आणखी लांबल्यास कमी कालावधीत परिपक्व होणाऱ्या वाणांचा विचार करावा. स्थानिक कृषी विभाग किंवा कृषी विद्यापीठाने शिफारस केलेल्या वाणांची निवड करणे फायदेशीर ठरते.
» पर्यायी पिकांचे नियोजन करा : खूप उशिरा पेरणीची वेळ आल्यास दीर्घ कालावधीच्या पिकांऐवजी अल्प कालावधीची पिके निवडावीत. मूग, उडीद, तीळ, बाजरी, सूर्यफूल, नाचणी या पिकांना तुलनेने कमी कालावधी आणि कमी पाण्याची आवश्यकता असते.
» जमिनीतील ओलावा जपण्यावर भर द्या : शेतात आडवे बांध मजबूत करावेत. पावसाचे पाणी शेतातच अडविण्याची व्यवस्था करावी. सेंद्रिय खतांचा वापर वाढवावा. नांगरणी व वखरणी करून पृष्ठभागावरील बाष्पीभवन कमी करावे.
» पेरणी झालेल्या शेतात उगवण तपासा : ज्या शेतकऱ्यांनी सुरुवातीच्या सरींवर पेरणी केली आहे त्यांनी उगवण नियमितपणे तपासावी. उगवण कमी असल्यास दुबार पेरणी किंवा अंतर भरून काढण्याचे नियोजन करावे.
» हवामान अंदाजावर लक्ष ठेवा : पुढील ५ ते ७ दिवसांच्या हवामान अंदाजाचा अभ्यास करूनच निर्णय घ्यावा. पावसाची शक्यता असल्यास आवश्यक निविष्ठांची पूर्वतयारी करून ठेवावी.
» पीकविमा आणि शासकीय योजनांची माहिती घ्या : पीकविमा योजनेची मुदत, पात्रता आणि अटी यांची माहिती घेऊन वेळेत नोंदणी करावी. कृषी विभागाकडून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा.

# सामान्य नागरिकांनी संपर्क करताच तुकाराम मुंढेंची तत्परता; पुण्यातील स्वीटमार्ट 'सील'




**पुणे (प्रतिनिधी)** – सध्या पोलिसांच्या धाडीची जेवढी चर्चा राज्यात नाही, तेवढी चर्चा अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून होत असलेल्या धाडीची भीती पानटपरी चालक, हॉटेल व्यवसायिक आणि मेडिकल दुकानदारांनाही आहे. विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढेंनी पदभार स्वीकारताचा ही कारवाई जोमाने होऊ लागली आहे. त्यातच, पुण्यातून एक महत्वाची आणि तितक्याच तत्पर कारवाईची माहिती समोर आली आहे.

पुण्यात नवीन दुचाकी खरेदी केल्याच्या आनंदात वाटण्यात आलेल्या पेढ्यांमुळे सात जणांना विषबाधा झाल्याची धक्कादायक घटना घडली. या दुर्घटनेत दोन लहान मुलांचाही समावेश असून सर्वांवर विविध रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. त्यापैकी एका रुग्णाची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले असून वडगाव शेरी आणि विमाननगर परिसरात ही घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वडगाव शेरी येथील एका रहिवाशाने नवीन दुचाकी खरेदी केल्यानंतर आनंद व्यक्त करण्यासाठी जवळील मिठाई दुकानातून पेढे खरेदी केले. हे पेढे नातेवाईक आणि परिचितांना वाटण्यात आले. मात्र, पेढे खाल्ल्यानंतर सात जणांना उलट्या आणि अस्वस्थतेचा त्रास सुरू झाला. या प्रकरणाची माहिती पीडितांच्या नातेवाईक अश्विनी शेवाळे यांनी दिली. याबाबत त्यांनी सांगितले की, संबंधित पेढे स्थानिक मिठाई दुकानातून खरेदी करण्यात आले होते. पेढे खाल्ल्यानंतर सर्वांची प्रकृती बिघडल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, या घटनेची तक्रार पोलिस आयुक्त अमितेश कुमार तसेच अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याकडे करण्यात आली. तक्रार मिळताच तुकाराम मुंढे यांनी तत्काळ अधिकाऱ्यांना कारवाईचे आदेश दिले.

संबंधित महिलेने आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याशी संपर्क साधून घडलेला प्रकार सांगितला. माहिती मिळताच अवघ्या काही मिनिटांत त्यांनी ऋऊ अधिकाऱ्यांना तपासाचे आदेश दिले. त्यानंतर ऋऊ च्या पुणे विभागाच्या पथकाने संबंधित रुग्णालयांना भेट देत रुग्णांची माहिती घेतली. त्यानंतर अधिकाऱ्यांनी संबंधित मिठाई दुकानावर छापा टाकून तपासासाठी पेढ्यांचे नमुने जप्त केले. हे पेढे नेमके कधी तयार करण्यात आले होते, त्यामध्ये कोणती भेसळ किंवा दूषित घटक होते का, याचा तपास आता प्रयोगशाळेच्या अहवालातून स्पष्ट होणार आहे.

प्राथमिक कारवाई म्हणून FDAने संबंधित मिठाई दुकान पुढील आदेशापर्यंत बंद ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. याबाबत माहिती देताना ऋऊ चे सहआयुक्त दिगंबर भोगावडे यांनी सांगितले की, पेढ्यांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील योग्य ती कारवाई करण्यात येईल. दरम्यान, चंदननगर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन दिवसांपूर्वीची ही घटना असून सध्या रुग्णांवर उपचार सुरू असून पेढ्यांचे नमुने ऋऊ कडे तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. तपासणी अहवालात त्रुटी किंवा निष्काळजीपणा आढळल्यास संबंधितांवर तात्काळ गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# संगीतकार प्रितम चक्रवर्तींचा बॉलीवुडला रामराम

**मुंबई (प्रतिनिधी)** – हिंदी सिनेसृष्टीतून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. 'चन्ना मेरेया', 'केसरिया' आणि 'शायद' यांसारख्या एकापेक्षा एक ब्लॉकबस्टर गाण्यांनी कोट्यवधी चाहत्यांना वेड लावणारी अरिजीत सिंग आणि प्रीतम ही जोडी आता कायमची तुटणार की काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. या वर्षाच्या सुरुवातीला जानेवारी २०२६ मध्ये अरिजीत सिंगने अचानक गाण्यातून संन्यास घेत धक्का दिला होता. आता पाठोपाठ बॉलिवूडचा अव्वल संगीतकार प्रीतम चक्रवर्ती यानेही सिनेसृष्टीला रामराम ठोकण्याचे संकेत दिले आहेत. आपल्या वाढदिवसाच्या दिवशीच प्रीतमने सोशल मीडियावर एक अत्यंत क्रिप्टिक पोस्ट शेअर केल्याने चाहत्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

बॉलिवूडला एकापेक्षा एक हिट गाणी देणाऱ्या प्रीतमने ५५ व्या वाढदिवशी आपल्या इन्स्टाग्रामवर काही ब्लॅक अँड व्हाईट फोटो पोस्ट केले. या फोटोंसोबत त्याने कॅप्शनमध्ये लिहिले, तुमच्या सगळ्यांच्या अथांग प्रेमासाठी आणि शुभेच्छांसाठी मनापासून धन्यवाद! आज माझ्या वाढदिवसाच्या निमित्ताने मी स्वतःला एक वेगळी जीवनशैली जगण्याची भेट देण्याचे ठरवले आहे. गेल्या अनेक वर्षांत धावपळीच्या आयुष्यात माझ्याकडून ज्या गोष्टी मागे सुटून गेल्या, त्या आता पूर्ण करण्याची वेळ आली आहे.

# संभाजीनगरमध्ये शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी काँग्रेसचा रास्तारोको



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** – शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आज छत्रपती संभाजीनगरमध्ये काँग्रेस आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. खासदार कल्याण काळे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस कार्यकर्त्यांनी संभाजीनगर-जालना महामार्गावरील केंब्रिज चौकात जोरदार 'रास्ता रोको' आंदोलन केले. काँग्रेसच्या या अचानक झालेल्या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली असून तब्बल ५ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. अखेर पोलिसांनी आंदोलक खासदार कल्याण काळे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधण्यासाठी काँग्रेसने ऐन गर्दीच्या वेळी केंब्रिज चौकात ठिय्या मांडला. जवळपास अर्ध्या तासाहून अधिक काळ हा मुख्य महामार्ग आंदोलकांनी रोखून धरला होता. त्यामुळे प्रवाशांचे मोठे हाल झाले आणि जालना रोडवर वाहतुकीचा प्रचंड खोळंबा झाला. आंदोलनाची तीव्रता पाहता पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत खासदार कल्याण काळे यांना ताब्यात घेतले, ज्यानंतर वाहतूक पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू झाले.

कर्जमाफीच्या जाचक अटी रद्द करा: सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफी योजनेतील जाचक अटी त्वरित रद्द करून सरसकट शेतकऱ्यांना लाभ द्यावा. ऑनलाईन खतविक्रीचे 'ॲप' बंद करा: सरकारच्या ऑनलाईन खतविक्रीला शेतकऱ्यांचा तीव्र विरोध आहे. खतविक्रीसाठी सरकारने सुरू केलेले ऑनलाईन ॲप तात्काळ बंद करावे, अशी मागणी काळे यांनी लावून धरली.

पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना खासदार कल्याण काळे यांनी सरकारला थेट इशारा दिला. ते म्हणाले, हे आंदोलन केवळ सुरुवात आहे. सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले आणि ऑनलाईन खतविक्रीचे जाचक ॲप बंद केले नाही, तर यापेक्षाही तीव्र स्वरूपाचे दुसरे मोठे आंदोलन छेडले जाईल. महायुती सरकारच्या फसव्या कर्जमाफीविरोधात आणि शेतकरी, कष्टकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी जालना जिल्ह्यातील परतूर येथे तालुका काँग्रेस अध्यक्ष बालासाहेब आकात यांच्या नेतृत्वाखाली भव्य जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात शेकडो ट्रॅक्टर्ससह हजारो शेतकरी, शेतमजूर आणि महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत सरकारच्या जनविरोधी धोरणांविरुद्ध तीव्र संताप व्यक्त केला.

# 'स्मार्ट मीटर प्रकल्प' त्वरीत स्थगित करण्याची जयंत पाटील यांची मागणी

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यात जुन्या मीटरच्या जागी बसवण्यात आलेल्या स्मार्ट मीटरमुळे सर्वसामान्य घरगुती ग्राहक आणि व्यापाऱ्यांना अवाढव्य वाढीव वीजबिले तसेच पूर्वसूचनेशिवाय थकीत दंडाचा भुर्दंड सोसावा लागत आहे. या वाढीव बिलांमुळे जनतेमध्ये तीव्र संतापाचे आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, राज्यातील जनतेची ही आर्थिक लूट थांबवण्यासाठी महावितरणचा हा 'स्मार्ट मीटर प्रकल्प' तातडीने स्थगित करण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री जयंत पाटील यांनी सोमवारी केली. याबाबत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना मागण्यांचे सविस्तर निवेदन दिले आणि यावर तातडीने तोडगा काढण्याची विनंती केली.

मुख्यमंत्री फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात आ. जयंत पाटील यांनी शेजारील गोवा राज्याचा दाखला दिला. ते म्हणाले, गोव्यातही अशीच गंभीर समस्या निर्माण झाली होती. मात्र, तेथील मुख्यमंत्र्यांनी जनहितार्थ स्मार्ट मीटर बसविण्याच्या मोहिमेला तात्पुरता 'ब्रेक' लावला असून, वाढीव बिलांची आणि दंडाची प्रकरणनिहाय तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत. महाराष्ट्रातही असाच दिलासादायक निर्णय घेऊन हा प्रकल्प थांबवण्याची अत्यंत गरज निर्माण झाली आहे, असे पाटील यांनी म्हटले आहे.

स्मार्ट मीटर बसवल्यापासून ग्राहकांना अचानक त्यांच्या आर्थिक क्षमतेच्या बाहेरची आणि प्रचंड वाढीव बिले येत असल्याकडे पाटील यांनी लक्ष वेधले. अनेक ग्राहकांनी घर बांधताना किंवा जोडणी घेताना मंजूर करून घेतलेल्या वीजभारापेक्षा (सँक्शंड लोड) सध्याचा प्रत्यक्ष वापर जास्त असल्याचे महावितरणकडून सांगितले जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे, ग्राहकांना कोणतीही पूर्वसूचना न देता थेट मागील कालावधीचा अवाढव्य दंड बिलांमध्ये आकारला जात आहे. अनेक ठिकाणी वर्षानुवर्षे जुनी मीटर बंद किंवा संथ गतीने चालत होती, ही पूर्णपणे वीज खात्याची चूक आणि प्रशासकीय दुर्लक्ष आहे. मात्र, त्याचा संपूर्ण आर्थिक भार आता एकाच वेळी दंडाच्या स्वरूपात सर्वसामान्य ग्राहकांवर टाकणे अत्यंत अन्यायकारक आहे. यामुळे स्मार्ट मीटरच्या अचूकतेबद्दल लोकांच्या मनात मोठी शंका निर्माण झाली असून राज्यातील अनेक भागांत तीव्र निदर्शने आणि आंदोलने सुरू झाल्याचे त्यांनी सांगितले.

# राज्यभरातील आरटीओ कर्मचाऱ्यांचा बेमुदत संपाचा इशारा

**मुंबई (प्रतिनिधी)** – अनेक प्रलंबित मागण्यांसाठी वारंवार दाद मागूनही प्रशासन केवळ वेळखाऊ धोरण राबवत असल्याचा आरोप करत, राज्यातील आरटीओ कर्मचाऱ्यांनी आरपारच्या लढाईची घोषणा केली आहे. उद्यापासून (१६ जून) राज्यभरातील आरटीओ कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपाचा एल्गार पुकारला आहे. या संपामुळे राज्यातील वाहन परवाने, गाड्यांचे पासिंग, आरसी बुक यांसह आरटीओ कार्यालयातील बहुतांश सर्वच कामे ठप्प होण्याची शक्यता असून सर्वसामान्यांना फटका बसणार आहे.

मोटार वाहन विभाग (आरटीओ) कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, विभागाचा नवीन आकृतीबंध मंजूर होऊन साडेतीन वर्षे उलटून गेली आहेत. तरीही अद्याप सेवाप्रवेश नियम तयार करण्यात आलेले नाहीत. नियम तयार नसल्याने अनेक कर्मचाऱ्यांना वेळेवर पदोन्नती मिळत नाही. यामुळे आर्थिक आणि सामाजिक नुकसान होत आहे. असा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे.

संपाबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी शनिवारी संघटनेची एक तातडीची आणि महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत सर्व पदाधिकारी आणि सक्रिय कार्यकर्त्यांनी प्रशासनाच्या धोरणावर कडाडून टीका केली. कर्मचाऱ्यांच्या बहुतांशी मागण्या या केवळ प्रशासन स्तरावर सहज सुटू शकतात, मात्र वरिष्ठ अधिकारी जाणीवपूर्वक याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. बैठकीअंती आता 'बेमुदत संपाशिवाय दुसरा कोणताही पर्याय राहिलेला नाही' यावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

# अधिवेशन कालावधीत गर्दीवर नियंत्रणासाठी डिजिटल प्रवेशपास



**मुंबई (प्रतिनिधी)** – येत्या २२ जूनपासून सुरू होणारे विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरळीत, सुरक्षित आणि नियोजनबद्धरित्या पार पाडण्यासाठी विधानभवन परिसरात शिस्त आणि सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येणार आहे. अधिवेशन काळात विधानभवनातील अनावश्यक गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी 'डिजिटल प्रवेशपास' व्यवस्था सुरू करण्यात यावी, असे निर्देश महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी सोमवारी दिले. पावसाळ्याचे दिवस लक्षात घेता सुरक्षित मंडप, चोख सुरक्षा आणि स्वच्छता याबाबत सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

सन २०२६ च्या या पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर, विधानभवन मुंबई येथे पूर्वतयारीसंदर्भातील उच्चस्तरीय आढावा बैठकीचे आयोजन सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. या बैठकीत सुरक्षा व्यवस्थेसह वाहनतळ, अखंडित वीज-पाणी, इंटरनेट सुविधा आणि आपत्कालीन व्यवस्था या सर्व महत्त्वाच्या बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

अधिवेशनादरम्यान होणारी गर्दी टाळण्यासाठी आणि दैनंदिन कामकाज विनाअडथळा पार पाडण्यासाठी कार्यालयीन अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या येण्या-जाण्यासाठी पर्यायी प्रवेशद्वाराची व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी प्रवेश नियंत्रणव्यवस्था काटेकोर ठेवण्याचे आदेश देतानाच, पोलीस विभागाने सुरक्षेच्या दृष्टीने पुरेसा बंदोबस्त ठेवावा, अशा सूचना सभापतींनी दिल्या. तसेच सुरक्षा यंत्रणेत तैनात कर्मचाऱ्यांसाठी अन्न पाकिटांची योग्य व्यवस्था आणि सुसज्ज उपहारगृहाबाबत अत्यंत काळजी घेण्याचे निर्देश त्यांनी दिले.

बैठकीत सार्वजनिक आरोग्य विभागाने अनुभवी डॉक्टरांच्या उपलब्धतेसह सुसज्ज वैद्यकीय सुविधा तैनात ठेवण्याचे निर्देश दिले. तर सार्वजनिक बांधकाम विभागाने (पीडब्ल्यूडी) पावसाची शक्यता गृहीत धरून सुरक्षित सभा मंडप व पूरक कामे तात्काळ पूर्ण करावीत आणि विद्युत विभागाने अखंडित वीज पुरवठा सुनिश्चित करावा, असेही बजावण्यात आले आहे.


## Change In Name

My old Name is **DARKASHA ANJUM FAZAL AHMED** Which now I am Changing as New Name **DARKASHA ANJUM SYED ZAKIRHUSEN.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: ASRA NAGAR, NEAR AIRPORT ROAD, SANGAVI BK, NANDED-431605

Mob: 7588424786

## Change In Name

My old Name is **SAYYED WASEEM** Which now I am Changing as New Name **SAYYED WASEEM SAYYED KHALANDAR.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name.

Address: H.NO.1-9-617, HANUMAN MANDIR ROAD, NEAR RAFIYYA MASJID, SHRI NAGAR, NANDED - 431605

Mob: 9767668632

## जाहिर प्रगटन

मौजे टेभूर्णी ता. नायगांव खै. येथील सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्रीमती कमलबाई यशवंत विभुते रा टेभूर्णी ता. नायगांव खै. यांनी अर्ज सादर करुन मौजे टेभूर्णी येथील गट क्र. 13 क्षेत्र 1.27 आर जमीन माझ्या मालकीची असून ताब्यात आहे. 7/12 च्या इतर अधिकारामध्ये साधे कुळ घनशाम कोंडजी ( 10006 ) अशी नोंद आहे. असे असलेले कुळाचे नांव कमी करुन देण्यात बाबत विनंती अर्ज सादर केलेले आहे.

तसेच याबाबत कुणाचे आक्षेप असल्यास 15 दिवसाचे आत मा. तहसिलदार नायगांव खै. यांच्याकडे सक्षम पुराव्यासह आपला आक्षेप नोंदवावा.

अन्यथा विहीत मुदतीनंतर शासन नियमानुसार इतर अधिकारातील कुळाची नोंद कमी करण्याची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद.

तहसिलदार नायगांव खै.

## टी.सी. हरवली

माझी सूर्यवंशी लक्ष्मीबाई मोतीराम या नावाची आठवी पासची टी.सी. व मार्कमेमो नायगाव ते नांदेड प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

– संपर्क पत्ता –
लक्ष्मीबाई मोतीराव सूर्यवंशी
रा. रोहिदासनगर, नायगाव
मो.नं. ९४२१७५८४१४

## टी.सी. हरवली

माझी साईनाथ मारोती पांचाळ या नावाची दहावी पासची टी.सी. बाबानगर ते अण्णाभाऊ साठे चौक ऑटो प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

– संपर्क पत्ता –
साईनाथ मारोती पांचाळ
रा. सम्राटनगर, नांदेड

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८


## जाहीर प्रगटन

**हिमायतनगर येथील दिवाणी न्यायाधिश क.स्तर, यांचे न्यायालयात हिमायतनगर जि. नांदेड**
**किरकोळ अर्ज क्र. आर.जे.ई. ६२/२०२६**

अर्जदार-

१. नीता भ्र. अशोक जाधव, वय-४१ वर्षे, धंदा- घरकाम,
२. कार्तिक पि. अशोक जाधव, वय- २७ वर्षे, धंदा- शेती/नौकरी,
३. रुद्राक्षी पि. अशोक जाधव, वय-२० वर्षे, धंदा- शिक्षण,
४. आरती भ्र. आकाश राठोड, वय-३० वर्षे, धंदा- घरकाम,
सर्व रा. दरेगांव तांडा ता. हिमायतनगर जि. नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार- निरंक

मुंबई विनीमय कायदा १८२७ नुसार मयत नामे अशोक अमरसींग जाधव ह्यांच्या मृत्युपश्चात अर्जदारास कायदेशिर वारसा उत्तराधिकारी प्रमाणपत्र जारी करणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, अशोक अमरसींग जाधव, यांचा मृत्यु दिनांक ०४/०२/२०१९ रोजी मौजे नागपुर ता. जि. नागपुर येथे मयत झाले आहेत. अशोक अमरसींग जाधव हे रा. दरेगांव तांडा, ता.हिमायतनगर जि.नांदेड येथिल रहिवाशी होते. मयतांच्या पश्चात अर्जदार हे वरील पत्यावर राहतात. त्यांनी कायदेशीर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदार हयांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी सर्व संबधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदार हयांचे नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरुपात स्वतः हजर राहुन अथवा त्यांचे विधीज्ञ मार्फत ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही काही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दिनांक १५/०६/२०२६ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्याने देण्यात आले.

आदेशावरुन,

क. लिपीक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, हिमायतनगर

सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, हिमायतनगर

## प्रवेश देणे चालू आहे

(सरकार मान्य) वर्ष २०२६-२०२७
**श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलीत**
**संत गाडगेबाबा विद्यार्थी वसतीगृह लोहा व**
**श्री नाईक विद्यार्थी वसतीगृह लोहा**

ह्या दोन वसतीगृहामध्ये प्रवेश देणे चालू आहे. सन 2026 2027 यासाठी प्रवेश देणे बाबत. शासनमान्य वसतीगृह शैक्षणिक वर्ष 2026-27 साठी स्थानिक विद्यालयात प्रवेश घेणाऱ्या इसता 5 ते 10 वी वर्गात शिकत असलेल्या गरजु विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देणे चालू आहे. तरी खालील प्रमाणे जातीनिहाय टक्केवारी नूसार प्रवेश देण्यात येईल. 2026-20027

| अ.क्र. | जातीचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | अनुसूचित जाती (SC) (एस.टी.) | 67 टक्के |
| 2 | भुसूचित जमाती (एस.टी.) | 14 टक्के |
| 3 | विमुक्त जाती/भटक्या जमाती व्ही.जे.एन.टी. | 17 टक्के |
| 4 | विशेष मागासवर्ग | 02 टक्के |
| एकूण | | 100 टक्के |
| 5 | इतर मागासवर्ग | 15 टक्के |
| 6 | खुला प्रवर्गा | 05 टक्के |

वैशिष्ट्ये : 1) मोफत प्रवेश, 2) सुसज्ज इमारत, 3) मोफत निवास व भोजनाची सोय, 4) पेट्याची सोय, 5) अंथरुण पांघरुणाची सोय, 6) सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्याच्या नजरेत.

अधीक्षक मो: ९८९००३७९६२, ९८९००२९७२३

अध्यक्ष
संत गाडगेबाबा विद्यार्थी व श्री नाईक विद्यार्थी वसतीगृह,
लोहा ता. लोहा जि. नांदेड

स्थापना १९६७ | नोंदणी क्र. एफ-१२१

यशवंत भारत भुषण शिक्षण प्रसारक मंडळ नांदेड संचलित

## जनता मुलींचे वसतिगृह नांदेड

पत्ता :- मालेगाव रोड, संजय गांधी शाळेसमोर, शिवरोड नांदेड ४३१६०५

### प्रवेश देणे चालू आहे

शासन मान्य

सदरील शासनमान्य अनुदानित महिला विकास विद्यार्थिनी वसतिगृहात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये इयत्त पाचवी ते दहावी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थीनींना खालील प्रवर्गानुसार मोफत प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती (एस.सी) | ६७ टक्के |
| २ | अनुसुचीत जमाती (एस.टी) | १४ टक्के |
| ३ | विमुक्त जाती व भटक्या जमाती (व्ही.जे.एन.टी.) | १७ टक्के |
| ४ | विशेष मागासप्रवर्ग (एस.बी.सी.) | ०२ टक्के |
| ५ | इतर मागासप्रवर्ग (ओ.बी.सी.) | १५ टक्के |
| ६ | बिगर मागास प्रवर्ग (ओपन) | ०५ टक्के |

अधिक्षिका - मो. ९१३०२२६८४४

**संचालक**
**करण माधवराव भरणे**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधितास या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार नामे हनुमानसिंह मोतीरामसिंह ठाकुर वय ६२ वर्षे, धंदा खाजगी नौकरी रा. विष्णुपुरी ता.जि. नांदेड मो.नं.९४०५२९७२१४ यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार मयत कौशल्याबाई जगन्नाथसिंग चव्हाण व मयत बाबुसिंग उर्फ जगन्नाथसिंग रा. खैरगाव (खु.) ता. अर्धापुर जि. नांदेड हा. मु. गाडीपुरा नांदेड यांची मुलगी मयत अनिता बाबुसिंग उर्फ जगन्नाथसिंग हीचे पती असुन माझ्या पक्षकाराच्या पत्नीचे विवाह नंतर अनिता हमुनासिंह ठाकुर असे नाव झाले आहे. माझ्या पक्षकाराच्या पत्नीचे निधन दि.०९/०९/२०१९ रोजी झाले,

माझ्या पक्षकाराची पत्नी मौजे खेरगांव (खु) ता. अर्धापुर जि.नांदेड येथील शेत जमीन गट क्र. ३९ च्या सात बारावर माझ्या पक्षकाराच्या पत्नीचे नाव फेरफार क्र.७६ नुसार इतर अधिकारात असुन ही जमीन माझ्या पक्षकाराच्या पत्नीची वडीलोपाजीत जमीन आहे.

पत्नीच्या निधनानंतर माझे पक्षकार पाचवे दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर नांदेड यांचे न्यायालयात किरकोळ दिवणी अर्ज (ठगए) क्र.११८४/२०१९ नुसार त्यांची पत्नी अनिता हिचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे माझ्या पक्षकाराच्या पत्नीचे नाव बरौल शेत जमीनीत इतर अधिकारात असल्यामुळे तिचे हित संबंध कायदेशीर वारस म्हणून माझ्या पक्षकारास प्राप्त झाले आहेत. म्हणून या जमीनीत माझ्या पक्षकाराचे हित संबंध आहेत. माझे पक्षकार मा. तहसिलदार, मा. तलाठी यांचेकडे उपरोक्त शेत जमीनीबाबत वारसा आधारे सात बाराला नोंद घेण्यात यावी म्हणून अर्ज दाखल केलेला आहे.

माझ्या पक्षकाराच्या पत्नीचे निधन झाल्यानंतर माझ्या पक्षकाराच्या माधारी न विचारता संमती न घेता दिलीपसिह जगन्नाथसिंह ठाकुर, पुनीतसिंह विक्रमसिंह चव्हाण अ.पा.क. आजी शोभाबाई शंभूसिंह चव्हाण, अशोकसिह बाबूसिंह ठाकुर उर्फ जगन्नाचसिह, प्रकाशसिह जगन्नाथ सिंह चव्हाण व अमरसिग बाबुसिंग ठाकुर या लोकांनी बेकायदेशीररीत्या माझ्या पक्षकाराच्या पत्नीचे हितसंबंध असलेली शेत जमीन तिघांनी विक्री केलीली असुन दोघानी विकण्याच्या प्रयत्नात आहेत त्यामुळे माझ्या पक्षकाराचे भविष्यात भरुन न निघणारे नुकसान होवु नये म्हणून माझ्या पक्षकाराचे त्याच्या पत्नीचे वारस म्हणुन हितसंबंध असल्यामुळे या जमीनीच्या खरेदी विक्री व्यवहार व इतर कोणताही व्यवहार कोणासोबतही करण्यात येवु नये जर या जमीनीबाबत कोणी व्यवहार केल्यास त्याच्या विरुध्द माझे पक्षकार योग्य त्या न्यायालतया त्याचे विरुध्द कार्यवाही करतील होणाऱ्या परिणामास माझे पक्षकार जबाबदार राहाणार नाहीत. याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन

मार्फत
ॲड. जिगळेकर यशवंत चांदराव, नांदेड
मो.नं. ७७०९०४३१५०

जाहीर प्रगटन देणार
हनुमानसिंह मोतीरामसिंह ठाकुर
रा. विष्णुपुरी ता.जि. नांदेड
मो.नं.९४०५२१७२९४

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## शाळा प्रवेशोत्सवात नवप्रवेशितांचे जल्लोषात स्वागत

### ♦ मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्यासह अधिकाऱ्यांच्या विविध शाळांना भेटी

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र शासनाच्या शाळा प्रवेशोत्सव अभियानांतर्गत नांदेड जिल्ह्यात विविध जिल्हा परिषद शाळांमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनातील पहिला दिवस संस्मरणीय ठरावा, या उद्देशाने जिल्हाभरातील विविध शाळांना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेटी देऊन नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी जिल्हा परिषद हायस्कूल, विष्णुपुरी येथे भेट देऊन नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमादरम्यान आरोग्यदूत म्हणून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना बॅच व आरोग्यदूत पुस्तिका देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती



(एनएमएमएस) परीक्षेत यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा बक्षीस देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा आरोग्य अधिकारी, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती नांदेड, विभागीय समन्वयक, शिक्षण विस्तार अधिकारी तसेच जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरीच्या मुख्याध्यापिका उपस्थित होत्या. दरम्यान, विभागाचे शिक्षण उपसंचालक दीपक चवणे यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पार्डी (म.), ता. अर्धापूर येथे सदिच्छा भेट देत विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप केले. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमास तालुका गटशिक्षणाधिकारी लोकडाजी गोडबोले, शिक्षण विस्तार अधिकारी निजाम शेख, संबंधित शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाधिकारी यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी तसेच इतर अधिकाऱ्यांनी विविध शाळांना भेटी देऊन नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेबाबत आत्मीयता निर्माण होऊन त्यांच्या शैक्षणिक प्रवासाची आनंददायी सुरुवात झाली.

## जुना मोंढा भागातील बॅग लिफ्टिंगमधील फरार आरोपी एलसीबीच्या जाळ्यात

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहरातील वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत बॅग लिफ्टिंग करून दरोड्यासारखा गंभीर गुन्हा करणारा फरार आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केला आहे. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे यांच्या टीमने सोमवार, दि. १५ जून रोजी केली.

दि. ३० मार्च २०२६ रोजी रात्री आठ वाजताच्या सुमारास तक्रारदार सोहनलाल मोतीलाल परमार, रा तेरापंती भवन समोर नेहरू नगर, जालना यांचे जुना मोंढा येथील मा. आरबुंदा ट्रेडींग नावाचे आडतचे ऑफीसमध्ये तीन अनोळखी इसम घुसले व त्यांनी खंजरचा धाक दाखवून आडत ऑफीसमध्ये काम करणारे शिवहार पतरावाळे यांचेकडून ऑफीसमधील १० लाख ५० हजार रुपये असलेली बॅग जबरीने चोरुन घेऊन गेले. या प्रकरणीच्या तक्रारीवरून वजिराबाद येथे दि. १ एप्रिल २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरील गुन्ह्याच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे आपले सहकारी पोउपनि मिलिंद सोनकांबळे व त्यांच्या पथकातील अंमलदार यांना वजिराबाद हद्दीतील जुना मोंढा परिसरात झालेल्या बॅग लिफ्टींगच्या दरोड्याच्या टोळीमधील पाहिजे आरोपी महेश आनंदराव शिंदे हा तीन महिन्यांपासून पाहिजे असल्याने त्यास ताब्यात घेण्याबाबत आदेशीत करून रवाना केले.

सोमवार, दि. १५ जून २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड येथील पोउपनि मिलिंद सोनकांबळे व टिमने या गुन्ह्यातील पाहिजे आरोपी महेश शिंदे याचा शोध घेत असतांना त्यांचे पथकातील अंमलदार यांना गुप्त खबऱ्यामार्फत माहिती मिळाली की, वजिराबाद हद्दीतील जुना मोंढा परिसरात बॅग लिफ्टींगचा गुन्हा केलेला आरोपी हा देगलूर नाका हैदर गार्डन फंक्शन हॉलच्या समोर नांदेड येथे थांबलेला आहे. त्यावरून वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे पथक देगलूर नाका हैदर गार्डन फंक्शन हॉलच्या समोर नांदेड येथे जाऊन आरोपी महेश आनंदराव शिंदे (वय २२ वर्षे रा. शंकरनगर वसरणी नांदेड) यास ताब्यात घेऊन अधिक विचारपूस केली असता त्याने हा गुन्हा केल्याबाबत कबुली दिली. त्यावरुन आरोपीस पुढील कार्यवाही कामी पो.स्टे. वजिराबाद यांचे ताब्यात देण्यात आले आहे. सदरची कामगिरी करणारे अधिकारी व अंमलदार यांचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने यांनी कौतुक केले आहे.

## नियमांचे पालन करूनच औषधींची विक्री करण्याचे अन्न व औषध प्रशासनाचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** –आज नांदेड शहरातील मे. तोष्णीवाल मेडिकल्स, डॉक्टर्स लेन नांदेड या पेढीकडून मुदतबाह्य औषधाची डॉक्टराच्या चिठ्ठीशिवाय, फार्मासिस्टचे गैरहजेरीमध्ये विना बिलांने विक्री झाल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे सदरील पेढीविरुद्ध औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियम १९४५ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

औषध विक्रेत्यांनी डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय फार्मासिस्टचे गैरहजेरीमध्ये विना बिलाने औषधाची विक्री करू नये. डॉक्टराच्या चिठ्ठीवरील औषधी विक्री करतेवेळी विक्री करण्यात येत असलेल्या औषधाचा तपशील व औषधावर नमूद तपशील यामध्ये तफावत आढळून येणार नाही याची त्यांनी गांभीर्याने दक्षता घ्यावी. मुदतबाह्य औषधांचे सेवनामुळे रूग्णांचे आरोग्यावर त्याचे विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी मुदतबाह्य औषधी विक्री होणार नाही याची कटाक्षाने दक्षता घ्यावी, असे आवाहन सर्व औषधी विक्रेत्यांना करण्यात आले आहे.

सर्व औषध विक्रेत्यांनी सतर्क राहून औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियम १९४५ चे पालन करूनच औषधांची विक्री करावी. कायद्याचे उल्लघंन झाल्यास किंवा त्यांचेविरुद्ध या प्रशासनास तक्रारी प्राप्त झाल्यास व सत्यता पडताळणीमध्ये दोषी आढळून आल्यास त्यांचेविरुद्ध कडक कारवाई घेण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जुगार अड्ड्यावरील धाडीत १८ लाखांचा मुद्देमाल जप्त; १५ जुगाऱ्यांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहराच्या विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत गाडेगाव रस्त्यावर सुरू असलेल्या एका क्लबवर उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने यांच्या मार्गदर्शनाखाली विमानतळ पोलिसांनी कारवाई करत क्लबवरून १८ लाख ७१ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. एवढेच नाही तर २८ जुगाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यापैकी १५ जुगाऱ्यांना अटक केली आहे. विशेष म्हणजे यापूर्वीही या क्लबवर पोलिसांनी कारवाई केली होती.

पोलिसांनी जुगाराचे साहित्य व एकूण ३२० प्लास्टीक कॉईन, २० मोबाईल, ८ दुचाकी व २ कार असा एकूण १८ लाख ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. जिल्ह्यातील अवैध व्यवसायास आळा घालण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन क्रॅकडाऊन अंतर्गत अवैध मटका, जुगार, अंमली पदार्थ तसेच अवैध धारदार शस्त्रे यांच्याविरुद्ध कठोर व प्रभावी कारवाई करून संबंधित गुन्ह्यातील मूळ सूत्रधारांचा शोध घेऊन त्यांच्याविरोधात गुन्हे दाखल करण्याचे आदेश अधिनस्त अधिकारी कर्मचाऱ्यांना दिले होते.

त्यानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने व विमानतळ ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे आणि त्यांच्या पथकातील अमलदार यांना पो.स्टे. विमानतळ हद्दीतील गाडेगाव रोड कामठा परिसरात जगनलाल यादव यांचे जागेत काहीजण त्यांच्याकडे शासन प्राधिकृत अधिकारी यांचा मनोरंजन केन्द्राचा परवाना असल्याचे भासवून त्याठिकाणी मनोरंजनाचे खेळ न घेता अवैधरित्या पपलु नावाचा पत्याचा जुगार पैशाने खेळत व खेळवित असल्याची माहिती मिळाली. सदर ठिकाणी छापा कारवाई करून जुगाराचे साहित्य व एकूण ३२० प्लास्टीक कॉईन, २० मोबाईल, ८ मोटारसायकल व २ कार असा एकूण १८ लाख ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यावेळी २८ जणांविरुद्ध विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक राष्ट्रपाल लोखंडे करत आहेत.

अटक केलेल्यांमध्ये यांचा आहे समावेश– शुभम संजयसिंह ठाकूर रा. गाडीपुरा नांदेड, विजयसिंह करणसिंह ठाकूर रा. गाडीपुरा नांदेड, सत्यनारायण विजयसिंह बेस रा. गाडीपुरा नांदेड, सोमेश्वर कोंडीबा आचमारे रा. शिवनगर नांदेड, प्रकाश जळबाजी जमदाडे रा. सिध्दार्थ नगर पूर्णा ता. पूर्णा जि. परभणी, शेख शफी शेख मोईन रा. उमर कॉलनी देगलूर नाका नांदेड, सोनु संजयसिंह ठाकूर रा. गाडीपुरा नांदेड, कुंदन प्रकाश सूर्यतळ रा. आंबेडकर नगर नांदेड, राजूसिंह ग्यानसिंह ठाकूर रा. गाडीपुरा नांदेड, मोहम्मद गौस मोहम्मद आसीफ, रा. मोहम्मदीया कॉलनी देगलूर नाका नांदेड, विक्रमसिंह तारासिंह परमार, रा. गाडीपुरा नांदेड, अदनान अली नासेर अली रा. पिरबुऱ्हाण, नांदेड व ईतर १६ आरोपींचा समावेश आहे.

## ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत संशयित चोरट्यास अटक



**नांदेड (प्रतिनिधी)**– रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षा व मदतीसाठी रेल्वे सुरक्षा बल, नांदेड विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या ऑपरेशन अमानत व ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत १४ जून रोजी उल्लेखनीय यश संपादन करण्यात आले.

ऑपरेशन अमानत अंतर्गत, दि. ११ जून रोजी प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार एका महिला प्रवाशाने गाडी क्रमांक ०७०५४ काचिगुडा स्पेशल एक्सप्रेसच्या ए-१ कोचमधील बर्थ क्रमांक २२ वर आपली पर्स विसरून हजूर साहिब नांदेड स्थानकावर उतरल्याची माहिती मिळाली. तक्रार प्राप्त होताच RPF मुदखेडच्या कर्मचाऱ्यांनी तत्काळ कारवाई करून संबंधित डब्यातून पर्स शोधून सुरक्षित ताब्यात घेतली.

त्यानंतर दिनांक १४ जून रोजी संबंधित प्रवासी अंकिता गुप्ता यांनी RPF मुदखेड चौकी येथे उपस्थित राहून आवश्यक पडताळणी पूर्ण केल्यानंतर त्यांना पर्स सुपूर्द करण्यात आली. सदर पर्समध्ये टायटन कंपनीचे मनगटी घड्याळ, रिअलमी इअरफोन्स १ हजार ७१० रुपये, दोन डेबिट कार्ड, चाव्या व मोबाईल चार्जर असा सुमारे ९ हजार रुपये किमतीचा ऐवज होता. हरवलेला माल सुखरूप परत मिळाल्याबद्दल प्रवाशांनी RPF चे आभार व्यक्त केले.

याच दिवशी ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत आणखी एका महत्त्वपूर्ण कारवाईत RPF च्या गुन्हे गुप्तवार्ता शाखेने, नांदेड यांनी परभणी रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सामान चोरीविरोधात विशेष देखरेख करत असताना एका संशयित चोरट्यास ताब्यात घेतले. सदर व्यक्ती प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर उभ्या असलेल्या गाडी क्रमांक १७६६२ नागरसोल-काचिगुडा एक्सप्रेसमध्ये चढणाऱ्या प्रवाशांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न करताना आढळून आली. ताब्यात घेण्यात आलेल्या संशयितास पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी GRP परभणी यांच्या स्वाधीन करण्यात आले. त्यानंतर महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ११० व ११७ अन्वये गुन्हा क्रमांक १२८/२०२६ नोंदविण्यात आला असून पुढील तपास GRP मार्फत सुरू आहे.



**नांदेड** –केंद्र व राज्य सरकारच्या निषेधार्थ शहरातील अहिल्यादेवी होळकर नियोजित स्मारकापासून महात्मा फुले पुतळ्यापर्यंत जिल्हा काँग्रेसच्यावतीने मशाल यात्रा काढण्यात आली. यावेळी खासदार रवींद्र चव्हाण, युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवाजी मोरे, जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार, युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष शंकर शिंदे, प्रा. डॉ. यशपाल भिंगे, सुरेंद्र घोडजकर यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते दिसत आहेत.

## नवजात स्त्री अर्भकाचा मृतदेह आढळल्याने गोर्लेगाव-बेलमंडळ परिसरात खळबळ

**हदगाव (प्रतिनिधी)** – तालुक्यातील गोर्लेगाव ते बेलमंडळ रस्त्यालगत असलेल्या पाण्याच्या डोहात एका दिवसाच्या नवजात स्त्री अर्भकाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ही घटना सोमवार, दि. १५ जून रोजी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली.

घटनेची माहिती बेलमंडळ येथील पोलीस पाटील तसेच सरपंच यांनी हदगाव पोलिसांना दिल्यानंतर पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी घटनास्थळी भेट दिली व त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस उपनिरीक्षक जी. एस. बर्गे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. त्यानंतर नवजात अर्भकाचा मृतदेह उपजिल्हा रुग्णालय हदगाव येथे शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. शवविच्छेदनानंतर शासकीय नियमानुसार अर्भकावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रकरणी बातमी लिहीपर्यंत हदगाव पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. पोलिसांकडून पुढील तपास करण्यात येत आहे. नवजात अर्भकाला डोहात टाकणाऱ्या व्यक्तीचा आणि त्यांना मदत करणाऱ्यांचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले आहे.

## सदाशिव देवणीकर यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील सेवानिवृत्त शिक्षक तथा सिद्धिविनायक अपार्टमेंट पूर्णा रोड नांदेडचे रहिवासी सदाशिवराव देवणीकर यांचे वृद्धापकाळाने सोमवार, दि. १५ जून रोजी निधन झाले. ते ८८ वर्षांचे होते.

त्यांच्या पश्चात मुलगा ॲड. काशिनाथ, सून, ३ मुली, जावई, नातवंडे, पणतू असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर मंगळवार, दि. १६ जून रोजी सकाळी ११ वाजता गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## कहाळा (बु.) येथील प्रा. शाळेत पहिल्या दिवशी नवागतांचे स्वागत

**नांदेड (प्रतिनिधी)** –नायगाव तालुक्यातील कहाळा बु. येथील जि. प. शाळेत पहिल्या दिवशी छोटेखानी कार्यक्रमात नवागतांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

यावेळी सर्वप्रथम माता सावित्रीच्या प्रतिमेचे पूजन शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष नय्यूम सय्यद, सेवानिवृत्त प्राध्यापक व्ही. एन. नारवाड, माजी सरपंच जब्बार साहब आणि शाळेचे मुख्याध्यापक तथा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक संभाजी आलेवाड यांनी केले. नंतर नवीन प्रवेशीत इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. प्रवेशपात्र विद्यार्थी संख्या ३४ होती, परंतु प्रत्यक्षात प्रवेश ४४ झाले आहेत. यावेळी नवागतांसोबत शाळेतील २९२ विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तके, नवीन गणवेश आणि शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी पहिल्याच दिवशी शाळेची उपस्थिती १०० टक्के असल्याची माहिती मुख्याध्यापक आलेवाड यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील वानखेडे यांनी केले तर आभार सादक पठाण यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी पाटील, हंबर्डे, आमेटवाड, होळकर, श्रीमती सिद्दी, श्रीमतीवाघमारे यांनी प्रयत्न केले. राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## जि. प. शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण -आयुक्त डॉ. डोईफोडे

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्हा परिषद शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत असून, आम्हीही जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी असल्याचे प्रतिपादन नांदेड वाघाळा शहर मनपाचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी केले. जिल्हा परिषद शाळा जुना कौठा येथे शाळेच्या पहिल्या दिवशी नवागतांचे स्वागत व विद्यार्थी यांना शालेय साहित्य मोफत गणवेश पाठ्यपुस्तके वाटप प्रसंगी ते बोलत होते.

जिल्हा परिषद शाळा जुना कौठा नांदेड येथे १५ जून रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा, शालेय गणवेश व मोफत पाठ्यपुस्तके वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी मनपाच्या शिक्षणाधिकारी श्रीमंती प्रवीणा मांदळे, केंद्रप्रमुख मठपती, विशेष शिक्षक



बाबू खान पठाण, वसरणीचे केंद्रप्रमुख शंकर मठपती, शालेय समिती अध्यक्ष प्रल्हाद काळे पाटील, बालाजी गोरे, पंडित काळे, पैलवान राम काळे, पत्रकार किरण देशमुख, रमेश ठाकूर व तिरूपती पाटील घोगरे यांच्यासह पालक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आयुक्त डॉ. डोईफोडे यांनी आम्ही जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी असल्याचे सांगून आता विद्यार्थिनींना शैक्षणिक सवलती, शिष्यवृत्ती मिळत आहे. या शाळेतील विद्यार्थी हे उच्च शिक्षण घेऊन विविध पदांवर कार्यरत असल्याचा अभिमान आहे. शाळेच्या पहिला दिवशी नवीन मुलांचा प्रवेश झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

मनपाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती प्रवीणा मांदळे यांनी मी जिल्हा परिषद शाळेची विद्यार्थिनी होते. आमच्या काळातील व आताच्या शिक्षणात खूप मोठा बदल झाला असल्याचे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक केंद्रप्रमुख मठपती यांनी केले तर सूत्रसंचालन भगवान बकवाड यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांचे स्वागत मुख्याध्यापक गोविंदराव शिंदे, शिक्षिका महानंदा पवळे, कविता महाजन, श्रीमती देगावकर, श्रीमती खमीतकर, श्रीमती सोमशेटवार, श्रीमती परबत यांनी केले.

यावेळी विविध स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी अंजली सोनटक्के, संतोष केशव बारसे, श्रध्दा काळे यांच्यासह उच्च माध्यमिक, शालांत परीक्षेसह अन्य परीक्षेतील उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच शाळेच्या प्रांगणात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. विजयकुमार गबाळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## इयत्ता दहावी व बारावी पुरवणी परीक्षांसाठी प्रतिबंधात्मक आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड जिल्ह्यात लातूर बोर्डाच्यावतीने १६ जून ते ८ जुलै २०२६ या कालावधीत इयत्ता १० वी व १२ वी पुरवणी परीक्षा घेण्यात येत आहेत. इयत्ता १२ वीच्या पुरवणी परीक्षा जिल्ह्यातील १७ केंद्रांवर तर इयत्ता १० वीच्या परीक्षा एकूण १४ केंद्रांवर सकाळी ११ ते सायंकाळी ६ या वेळेत घेण्यात येत आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये परीक्षा केंद्रापासून ५०० मीटरच्या परिसरात १६ जून ते ८ जुलै २०२६ रोजीपर्यत सकाळी ९ ते रात्री ७ वाजेपर्यंत या कालावधीत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधित असलेले अधिकारी व कर्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. तसेच परीक्षेच्या कामाशी संबंधित असलेले अधिकारी व कर्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅलक्युलेटर, ट्रॅन्झीस्टर, रेडिओ, लॅपटॉप इ. तत्सम साहित्य परीक्षा केंद्रात १०० मीटरपर्यंत परिसरात वापरण्यास व जवळ बाळगण्यास, तसेच परीक्षा केंद्रात नेण्यास, त्याचप्रमाणे वर दर्शविलेल्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरातील ५०० मीटरपर्यत सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एसटीडी, भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि ध्वनीक्षेपक चालू ठेवण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे, असे आदेश पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी निर्गमित केले आहेत.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com